# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## 'जात जनगणना खोटी...', बिहारमधून राहुल गांधींचा हल्लाबोल, मोदींवरही साधला निशाणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८पाटणा**

काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज बिहार दौऱ्यावर आहेत. त्यांनी पाटण्यात आयोजित कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. त्यांनी बिहार सरकारने केलेली जात जनगणना खोटी असल्याची टीका केली. आपल्या बिहार दौऱ्यात राहुल गांधी काँग्रेस नेत्यांसोबत बैठका घेणार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधींचा हा दौरा काँग्रेससाठी महत्त्वाचा मानला जात आहे.



खासदार राहुल गांधींनी शनिवारी बिहारची राजधानी पाटणा येथे संविधानाचे संरक्षण, या विषयावर आयोजित परिषदेत भाग घेतला. यावेळी राहुल गांधींनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर जोरदार निशाणा साधला. संविधान सुरक्षा परिषदेला संबोधित करताना राहुल गांधी म्हणतात, बिहारमध्ये खोटी जात जनगणना करण्यात आली. देशात जात जनगणना योग्य पद्धतीने करावी लागेल. जात जनगणनेशिवाय देशातील सर्वांचा विकास होऊ शकत नाही.

देशातील जातींची खरी परिस्थिती शोधणे आवश्यक आहे. मी संसदेत पंतप्रधान मोदींना सांगितले की, आम्ही तुमच्यासमोर जात जनगणना लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर करून घेऊ. जात जनगणना ही देशासाठी एक्सरे आणि एमआरआयसारखी आहे. कोणत्या वर्गात किती लोक आहेत, यातून कळेल, असंही राहुल गांधी यावेळी म्हणाले.आपल्या दौऱ्यादरम्यान राहुल गांधी सदकत आश्रमालाही भेट देतील. हे बिहार प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्यालय आहे. येथे ते नवीन कर्मचारी निवासस्थानाचे आणि नुकत्याच बांधलेल्या नवीन सभागृहाचे उद्घाटन करतील. या सभागृहाला त्यांच्या आजी आणि वडिलांचे नाव देण्यात आले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतरचा त्यांचा हा पहिलाच बिहार दौरा आहे. या वर्षी राज्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत, त्यामुळे राहुल गांधींचा हा दौरा खास आहे. राहुल गांधींच्या या दौऱ्याबाबत काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आणि नेत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. बिहारमध्ये पक्ष मजबूत करण्यासाठी आणि आगामी निवडणुकीची रणनीती बनवण्यासाठी हा दौरा महत्त्वाचा ठरणार असल्याचे मानले जात आहे.


## आरजी कर प्रकरणातील आरोपी संजय रॉय महिला डॉक्टरवर बलात्कार आणि हत्येप्रकरणी दोषी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८सियालदाह**

कोलकात्याच्या आरजी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणात आरोपी संजय रॉय दोषी आढळला आहे. सियालदाह न्यायालयाच्या विशेष न्यायालयाने आज हा निकाल सुनावला आहे.

अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अनिर्बान दास यांच्या न्यायालयात खटला सुरू झाल्यानंतर ५७ दिवसांनी हा निकाल देण्यात आला. या प्रकरणाची सुनावणी ११ नोव्हेंबर रोजी सुरू झाली. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घटनेचा तपास करणाऱ्या सीबीआयने या प्रकरणात आरोपपत्र दाखल केले होते.

गेल्या वर्षी ९ ऑगस्ट रोजी आरजी



कर रुग्णालयाच्या आपत्कालीन विभागाच्या चौथ्या मजल्यावरील सेमिनार हॉलमधून पीडितेचा मृतदेह आढळून आला होता. घटनेच्या दुसऱ्याच दिवशी मुख्य आरोपी, नागरी स्वयंसेवक संजय राय याला अटक करण्यात आली होती.या प्रकरणी गेल्या काही दिवसापासून कोर्टात सुनावणी सुरु होती. आता कोर्टाने संजय रॉय हाच या प्रकरणातील आरोपी असल्याचा निकाल दिला आहे.

**संजय रॉय एकटाच गुन्हेगार**

स्वयंसेवक संजय रॉय हा गुन्ह्याचा गुन्हेगार होता. त्याचे सीमन सॅम्पलही जुळले आहेत. सीबीआयचा दावा आहे की सीएफएसएलच्या अहवालात हे वीर्य संजय रॉय याचे असल्याचे पुष्टी झाली आहे. अनेक भौतिक पुरावे, परिस्थितीजन्य पुरावे आणि फॉरेन्सिक अहवालांच्या आधारे, संजयने हा गुन्हा एकट्यानेच केल्याचे सिद्ध होते.९ ऑगस्ट रोजी गुन्ह्याच्या ठिकाणी सापडलेला एक छोटासा केस फॉरेन्सिक लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आल्याचेही आरोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. अहवालात हा केस संजय रॉय याचा असल्याचे म्हटले आहे. घटनेच्या २४ तासांच्या आत कोलकाता पोलिसांनी त्याला अटक केली.

## आता दूषित रक्तासाठीही पैसे रक्तपेढ्यांसाठी सुधारित नियम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**



रक्तदान शिबिरांद्वारे संकलित झालेले दूषित रक्त यापूर्वी सरकारी, खासगी संशोधन संस्था व कंपन्यांना मोफत दिले जात होते. मात्र दूषित रक्ताची विल्हेवाट लावण्यासंदर्भात राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेने केलेल्या सुधारित नियमानुसार यापुढे दूषित रक्तासाठी खासगी संस्था, संशोधन संस्था आणि एचआयव्ही, कावीळचे किट बनविणाऱ्या उत्पादक कंपन्यांना पैसे मोजावे लागणार आहेत. तसेच यापुढे रक्त दूषित असल्यास ते उत्पादनासाठी किंवा संशोधनासाठी देण्यासाठीची परवानगी रक्तदात्याकडून रक्तदानाच्या वेळी घेण्यात येणार आहे.

या बैठकीमध्ये परवानाधारक रक्त केंद्रांने दूषित रक्त पाठविण्याबाबतचे सुधारित निकष तयार केले आहेत. त्यानुसार दूषित रक्त परवानाधारक सरकारी व खासगी भारतीय डायग्नोस्टिक किट निर्माती कंपनी, शैक्षणिक संस्था व संशोधन करणाऱ्या संस्थानाच पाठविता येणार आहे. मात्र दूषित रक्ताच्या पिशव्या सरकारी संस्थांना मोफत देण्यात याव्यात. तर खासगी शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था आणि स्वदेशी उत्पादकांना हे रक्त देताना संबंधित राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' घेण्यात यावे. दूषित रक्त पिशव्यांवर चाचणी आणि प्रक्रिया करण्यासाठी रक्तपेढ्यांना खर्च येतो. त्यामुळे खासगी संस्था व कंपन्यांना देण्यात येणाऱ्या रक्तपिशव्यांवर सरकारच्या मंजुरीनुसार शुल्क आकारण्यात यावे. जेणेकरून रक्ताच्या पिशवीच्या प्रत्येक युनिटवर झालेल्या खर्चाची भरपाई होईल, अशी तरतूद नव्या नियमामध्ये करण्यात आली आहे. हे रक्त फक्त भारतीय उत्पादनासाठीच वापरले जाईल याची काळजी परवानधारक रक्त केंद्रांना घ्यावी लागणार आहे.

दूषित रक्त पुरवठ्याबाबत राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून मंजुरी मिळाल्यानंतर रक्तपेढी व उत्पादक कंपनी यांच्यामध्ये करार करण्यात येईल. तसेच रक्त पिशवीचा पुरवठा करताना त्याचा डाटा पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे करारामध्ये नमूद असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे यापुढे रक्तदात्याकडून रक्तदानाच्या वेळी रक्त दूषित असल्यास ते उत्पादनासाठी किंवा संशोधनासाठी देण्यासाठीची परवानगी घेण्यात येणार आहे.

## चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियाची घोषणा; या १५ खेळाडूंना मिळालं दुबईचं तिकीट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा आणि बीसीसीआय निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्यात बीसीसीआय कार्यालयात जवळपास दोन ते तीन तास प्रदिर्घ चर्चेनंतर १५ सदस्यीय संघाची घोषणा करण्यात आली. जसप्रीत बुमराहच्या फिटनेसचा रिपोर्ट येताच टीम इंडियाचा संघ जाहीर कण्यात आला. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी भारतीय संघात

### या १५ खेळाडूंना मिळालं दुबईच तिकीट; चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी असा आहे भारतीय संघ

रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल (उप-कर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, हार्दिक पांड्या, अक्षेर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, यशस्वी जैस्वाल, रिषभ पंत, रवींद्र जडेजा.

मोहम्मद शमीचीही एन्ट्री झाली आहे. पण दुसऱ्या बाजूला मोहम्मद सिराजला बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे.

**रोहित शर्माच्या नेतृत्वाखालीच टीम इंडियात उतरणार मैदानात, शुबमन गिल उप कॅप्टन**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालीच भारतीय संघ मिनी वर्ल्ड कप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत खेळताना दिसेल. शुबमन गिल याच्यावर उप कॅप्टन्सीची जबाबदारी सोपवण्यात आलीये. रिषभ पंत, लोकेश राहुल आणि संजू सॅमसन या तिघांपैकी विकेट किपरच्या रुपात कुणाला पसंती देण्यात येणार ? हा मुद्दा चांगलाच चर्चेत होता. या तिघांतून संजूचा पत्ता कट झालाय.

**बुमराहसह कुलदीप-शमीही फिट**

स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादवसह मोहम्मद शमी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी फिट आहेत का? विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत दमदार कामगिरी करणाऱ्या करुण नायरला टीम इंडियात कमबॅकची संधी मिळणार का? असे अनेक प्रश्न क्रिकेट चाहत्यांच्या मनात होते. यात बुमराह, कुलदीप यादव आणि शमीसंदर्भात दिलासा देणारी बातमी मिळाली. मोहम्मद शमी २०२३ च्या वनडे वर्ल्ड कप स्पर्धेनंतर पुन्हा एकदा वनडे संघात खेळताना दिसेल. दुसरीकडे करुण नायरचा मात्र विचार झालेला दिसत नाही.

## संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींची सुटका नाहीच, न्यायालयीन कोठडीत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८बीड**

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण आणि हत्या प्रकरणातील ६ आरोपींच्या कोठडीची मुदत शनिवारी (ता.१८) संपली. या आरोपींच्या जामीन अर्जावर आज बीडच्या जिल्हा व सत्र न्यायालयात सुनावणी झाली.

यावेळी न्यायालयाने वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी पुढे ढकलली. त्यानुसार आता ती २२ जानेवारी रोजी होणार आहे. तर सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, प्रतीक घुले, जयराम चाटे, सिद्धार्थ सोनवणे या आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्याचा निर्णय न्यायमूर्ती सुरेखा पाटील यांनी दिला.बीडच्या



जिल्हा व सत्र न्यायालयात आज संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपींच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली. सुरक्षेच्या कारणास्तव ही सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात आली. या हत्या प्रकरणाचा मास्टरमाईंड असल्याचा आरोप होत असलेल्या वाल्मिक कराडला न्यायालयातून कोठडीत घेऊन जात असताना त्याच्या समर्थकांनी घोषणाबाजी केली होती.

यावेळी संतोष देशमुख यांचे समर्थक आणि कराडचे समर्थक आमनेसामने आले होते. असा काही प्रकार होऊ नये म्हणून आजची सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात आली. तर, मस्साजोग येथील आवादा कंपनीकडून २ कोटींची खंडणी मागितल्याप्रकरणी, १४ जानेवारीच्या सुनावणीत, केज न्यायालयाने कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

मात्र यानंतर लगेच कराडच्या वकिलांनी न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. त्या जामीन अर्जावर देखील आज सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी पुढे ढकलली. त्यानुसार आता ही सुनावणी २२ जानेवारी रोजी होणार आहे.

## राष्ट्रवादीच्या नवसंकल्प शिबिराला 'लिमिटेड' पदाधिकाऱ्यांनाच निमंत्रण; नाराजी नाट्य वाढलं

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८शिर्डी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिर्डी इथं होत असलेल्या नवसंकल्प शिबिरासाठी विदर्भातील काही मोजक्याच पदाधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले आहेत.

त्यामुळे इतर पदाधिकाऱ्यांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली आहे. विधानसभेची निवडणूक आटोपताच आमची गरज संपली का? असा सवालही आता केला जात आहे.

नागपूर जिल्ह्यातून फक्त चार पदाधिकारी शिर्डीला रवाना झाले आहेत. यात नागपूर शहराचे अध्यक्ष प्रशांत पवार, जिल्हाध्यक्ष बाबा गुजर, शहर कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर आणि प्रदेश उपाध्यक्ष अनिल अहीरकर यांचा समावेश आहे. इतर प्रदेश, विदर्भ आणि जिल्ह्यात वेगवेगळ्या पदावर कार्यरत असलेल्या पदाधिकाऱ्यांना नवसंकल्प शिबिरासाठी निमंत्रित करण्यात आले नाही.काही पदाधिकाऱ्यांनी थेट राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी संपर्क करून आपली



नाराजी व्यक्त केले असल्याचे सांगितले. त्यांना दादांना अधिवेशनाला येण्याचे तोंडी निमंत्रण दिले आहे. असे असले तरी शिर्डीच्या नवसंकल्प शिबिरासाठी अधिकृत निमंत्रिताशिवाय इतरांना सोबत आणू नये, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे तोंडी निमंत्रणावरून अद्याप कोणी गेले नसल्याचे समजते.

विधानसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने विदर्भात सात उमेदवार दिले होते. यापैकी सहा उमेदवार निवडून आले आहेत. सातवा उमेदवार अमरावती जिल्ह्यातील मोर्शी येथील होता. मात्र या जागेवर महायुती तुटली होती. भाजपने आपला उमेदवार उभा केला होता. त्यामुळे माजी आमदार देवेंद्र भुयार यांचा पराभव झाला. हिवाळी अधिवेशनापूर्वी नागपूर येथे झालेल्या नवनिर्वाचित आमदारांच्या सत्काराच्या कार्यक्रमात दादांनी विदर्भाचा स्ट्राईक रेट चांगला असल्याचे सांगून सर्वांचे अभिनंदन केले होते. त्यामुळे आम्ही पदे वाटप करताना तसेच शासकीय समित्या, मंडळ वापट करताना भेदभाव करणार नाही, असे सांगितले होते.नागपूरमध्ये अजित पवार, प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे तसेच राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयाचे उद्घाटनसुद्धा करण्यात आले होते. सध्या विदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसची जेमतेम ताकद आहे. महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आतापासूनच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गटबाजी निर्माण झाल्याचे यावरून दिसून येते. पूर्व विदर्भातील नेत्याने फक्त त्यांच्या मर्जीतीलच पदाधिकाऱ्यांना शिर्डी अधिवेशनाला येण्याचे निमंत्रण दिले असल्याचे समजते.

## भाजपकडून स्वबळावर जोर शिवसेनेला मात्र एमआयएमची भिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८संभाजी नगर**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत शहरातील तीनही मतदारसंघात महायुतीने बाजी मारली. मध्य, पश्चिम मतदारसंघात शिंदेंच्या शिवसेनेने तर पुर्व मतदारसंघात भाजपने विजय मिळवला. पैकी भाजपच्या अतुल सावे यांना विजयासाठी चांगलेच झगडावे लागले होते. तर विधानसभेच्या मध्य मतदारसंघात प्रदीप जैस्वाल साडेआठ हजारांच्या फरकाने निवडून आले. महायुतीच्या उमेदवारांनी विजय मिळवला असला तरी शहरामध्ये एमआयएमची ताकदही दिसून आली.

आगामी महापालिका निवडणुकीत भाजपने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. शिवसेनेने मात्र युतीतच लढलं पाहिजे, अन्यथा एमआयएमचा फायदा होईल, असे म्हणत युतीसाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेवला आहे. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत एमआयएमचे इम्तियाज जलील हे दुसऱ्या क्रमांकावर होते. शहरी आणि ग्रामीण भागात त्यांना सर्व जाती-धर्माच्या लोकांची मते मिळाली, पण त्यांचा पराभव झाला.

## संपादकीय ......

# नायलॉन मांजाचे आणखी किती बळी?

आनंदाचे प्रतीक असलेल्या मकरसंक्रातीच्या सणाला नायलॉन मांजामुळे यंदाही गालबोट लागले आहे. संक्रातीच्या सणानिमित्ताने पतंगबाजीचा खेळ खेळला जातो. यासाठी पारंपरिक मांजाचा उपयोग करायला हवा. मात्र, अलीकडे नायलॉन मांजाचाच वापर करत पतंग उडवण्याची भारी हौस अनेकांसाठी जीवघेणी ठरत आहे. इतरांपेक्षा आपलाच पतंग उंच उडावा आणि आपणच पतंगाचे किंग ठरावे या ईर्षेतून चक्क प्रतिबंधित नायलॉन मांजा वापरून सर्रास पतंग उडवले जातात. दुसऱ्या बाजूला घातक मांजामुळे निष्पाप जीवांचे नाहक बळी जातात, याकडे दुर्लक्ष होते. अनेक दुचाकीस्वारांच्या गळ्याला इजा झाल्याच्या घटना तर अनेक बालकांचे हात चिरले जाण्याचे सर्रास प्रकार या दिवसांत कानावर येतात. एवढंच नव्हे तर आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांचे जीवही धोक्यात आले आहे.

नाशिक जिल्ह्यामध्ये मनाला चटका लावणारी घटना मंगळवारी घडली. संक्रांतीच्या सणासाठी सोनू धोत्रे नावाचा तरुण गुजरातहून नाशिकला येत होता. पाच महिन्यांनंतर त्याचे लग्न होणार होते. सोनू धोत्रेच्या आई-वडिलांचे निधन झाले आहे. त्यामुळे तो सख्या भावाला भेटण्यासाठी आला होता. देवळाली कॅम्पकडे मोटर सायकलवरून जात असताना सोनूला नायलॉन मांजामुळे फास लागला अन् त्याचा गळा चिरला गेला. त्यात त्याला मृत्यूने कवटाळले. दुसऱ्या घटनेत नंदूरबारमधील कार्तिक गोरवे आजोबांसह मोटारसायकलवरून जात असताना, त्याच्या गळ्यात मांजा अडकला आणि कार्तिकचा गळा चिरला. कार्तिकला जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले; परंतु उपचारादरम्यान कार्तिकचा मृत्यू झाला. या घटनेने गोरवे कुटुंबावर शोककळा पसरली आहे.अकोला जिल्ह्यातील पालिका कर्मचारी मंगशे बोपटे हे दुचाकीवरून जात असताना गळ्यात मांजा अडकल्याने त्याचाही गळा चिरला गेला. त्याच्या गळ्यावर १५ टाके पडले. सुदैवाने त्याची प्रकृती स्थिर आहे. भंडारा जिल्ह्यात मोटार सायकलवरून जाणाऱ्या शुभम चौधरीचा गळा मांजामुळे चिरला गेला. सुदैवाने त्याचा जीव वाचला. यवतमाळ शहरासह जिल्ह्यात नायलॉन मांजा विक्रीवर जिल्हाधिकाऱ्यांनी बंदी आदेश काढलेला असतानाही पोलिसांच्या नाकावर टिच्चून नायलॉन मांजा विक्री आणि त्याचा वापर झाल्याचे चित्र संक्रांतीच्या दिवशी, यवतमाळ शहरात दिसले. या मांजाचा झटकाही एका ज्येष्ठ नागरिकाला बसला. पोलिसांकडूनही कडक कारवाई होणे अपेक्षित होते. मात्र, वरवरची कारवाई झाल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला. अशा अनेक घटना महाराष्ट्राच्या जिल्ह्या-जिल्ह्यांतून ऐकायला येत आहेत; परंतु प्रशासन म्हणावे तसे अॅक्शन मोडवर आल्याचे दिसत नाही. काही ठिकाणी कारवाईचा बडगा पाहायला मिळाला.

मांजाने बळी घेतल्याच्या घटनेनंतर सतर्क झालेल्या येवला पोलिसांच्या भरारी पथकाने कारवाई करत चौघांना ताब्यात घेतले. या चौघांकडून नायलॉन मांजा जप्त करण्यात आला. भिवंडीत महानगरपालिकेने केलेल्या धडक कारवाईत नायलॉन मांजा जप्त केला, अशा हाताच्या बोटावर मोजता येतील अशा कारवायांनी मांजा बंदी झाली असे म्हणायचे का? तसे पाहायला गेले तर पोलिसांना उशिरा सुचलेले शहाणपण म्हणावे लागेल. राज्यात प्लास्टिक बंदीचा कसा बट्याबोळ झाला हे जनतेने पाहिले आहे. कारवाई कोणावर होते तर ज्यांच्या हातात प्लास्टिकची पिशवी सापडते त्यांच्यावर? परंतु प्लास्टिकच्या पिशव्या उत्पादन करणाऱ्या कारखान्यांवर मोठी कारवाई झाल्याचे ऐकीवात नाही. त्यामुळे मुळावर घाव घालावा तसा प्लॉस्टिक बंदीसाठी ज्या ठिकाणी उत्पादन होते, त्याच ठिकाणी कडक कारवाई केली तर माल बाजारात आला नसता. तसाच काहीसा प्रकार नॉयलॉनच्या मांजांबाबत म्हणता येईल. हा मांजा ज्या ठिकाणी तयार होतो, तेथेच कारवाई केली तर बाजारात त्याचा साठा उपलब्ध होण्यावर अडचणी येतील; परंतु आपल्याकडे अनेक कायदे तयार होतात. मात्र, त्याची अंमलबजावणी करण्यावर उदासीनता दिसून येते.

नायलॉन मांजाच्या विक्री आणि वापरावर बंदी असतानाही प्रशासनाच्या सुस्त कारवाईमुळे दोघांना जीव गमवावा लागला, तर अनेकजण गळा चिरल्याने गंभीर जखमी झाले. या सणाला लागलेल्या गालबोटामुळे नायलॉन मांजा न वापरण्याचे आवाहन अनेक संस्थांनी केले आहे, तर नायलॉन मांजाच्या विक्रीविरोधात भरारी पथके नेमली असतानाही ही विक्री कशी सुरू आहे, हा प्रश्न कोड्यात टाकणारा आहे. त्याचे कारण जीवघेण्या नायलॉन मांजावर कायद्याने बंदी असली तरी ती फक्त कागदोपत्रीच मर्यादेत असल्याचे चित्र सध्या तरी सर्वत्र पाहायला मिळत आहे.

राज्यात आज संक्रात सणाच्या निमित्ताने पतंगबाजीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. प्रत्येक मकरसंक्रातीला नायलॉन मांजावरील बंदीची चर्चा होते. पण, नायलॉन मांजा विकणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाकडून जुजबी कारवाया केल्या जातात असे दिसते, त्यामुळे प्रशासनाकडून चिरीमिरी घेऊन नायलॉन मांजा विक्रीला छुपा पाठिंबा आहे का? असे अनेक प्रश्न नागरिकांच्या मनात आहेत. सध्या गल्लोगल्ली अनेक मुलांच्या हातात नायलॉन मांजा आणि गुंता झालेल्या नायलॉन मांजा रस्त्यावर पडलेला आढळून येत आहे. अनेकांचा जीव गेल्याच्या घटना घडत असतानाही, नायलॉन मांजा राज्यभरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. आता या प्रकरणी पोलीस प्रशासन गंभीर दखल घेणार आहे की नाही? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिक्षकाने दिशा दिली अन् त्याच आयुष्यच पालटलं,

# घरात अठरा विश्व दारिद्र असलेला अभिजीत झाला सहाय्यक अभियंता



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८दर्यापूर : –** आयुष्यात गुरु आणि शिक्षकाला किती महत्त्व आहे, याचं उदाहरण अनेकदा आपल्यासमोर येत. त्याचच प्रत्यय पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे पाहायला मिळालं. तसाच काहीसा अनुभव अमरावती जिल्ह्यातल्या दर्यापूर तालुक्यातील ६०० लोक वस्ती असलेल्या वडाळगव्हाण या गावात आला. शिक्षकाने त्याच्या कलागुणांना नेमकं टिपत त्याच्यातला अभियंता शोधला आणि त्याच्या आयुष्याला दिशा दिली. शिक्षकाच्या या मार्गदर्शनामुळे घरात १८ विश्व दारिद्र्य असलेला अभिजीतने आज थेट सहायक अभियंता पदापर्यंत मजल मारली. छोट्याशा गावात राहणाऱ्या अभिजीतने वयाच्या २४ व्या वर्षीच इतकी मोठी मजल मारल्याने त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागलेली आहे.

दर्यापूर तालुक्यातील वडाळगव्हाण हे ६०० लोक वस्तीच असलेल गाव. गावात आयुर्वेदिक दवाखान्या शिवाय अन्य सोयी सुविधांचा मोठा अभाव. तालुक्याच्या ठिकाणाहून जायला देखील मोठी कसरत करावी लागते. गावात पुरेशा प्रमाणात विकासाच्या सोयी सुविधा नाहीत. शिक्षणाचा तर या परिसरात मोठा अभाव. अशाच वातावरणातून येत अभिजीत मारुती कलाने या तरुणाने थेट महावितरण विभागाच्या सहाय्यक अभियंता या पदाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. अभिजीतने मिळवलेल्या या यशाची तालुक्यात आता चांगलीच चर्चा होऊ लागलेली आहे. अभिजीतची आई ही मदतनीस आहे. तर वडील मोलमजुरी करून आयुष्याचा उदरनिर्वाह चालवतात.

**निंभारीच्या शाळेतून झालं शिक्षण**

सहाय्यक अभियंता झालेल्या अभिजीत प्राथमिक शिक्षण जवळच्या निंभारी विद्यालयातून झालं. याविषयी सांगताना अभिजीत म्हणतो, की माझ्या आयुष्यात सर्वात मोठा टर्निंग पॉईंट म्हणजे माझे शिक्षक सुमित सावरकर. सुमित सरांनी माझ्यातल्या कलागुणांना वाव देण्याचा नेहमीच प्रयत्न केला. अमरावतीच्या शासकीय तंत्रनिकेतन मधून इंजिनिअरिंगचा डिप्लोमा घेत पुढे संभाजीनगर येथे उच्च शिक्षणासाठी गेलेल्या अभिजीतने स्पष्ट केले की, अभियांत्रिकी हे क्षेत्र माझ्यासाठी नवीन. माझ्या घरातलं कोणीही फारश शिक्षित नाही. या क्षेत्रातला माझा कल बघता माझ्या शिक्षकांनी लहानपणीच माझ्यातला अभियंता ओळखला होता. त्याप्रमाणे त्यांनी मला पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन केला आणि हे यश गाठता आल्याचे त्याने नमूद केले.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेसाठी कुठे कराल अर्ज ? वाचा सर्व माहिती

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक** – सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेचा आधार घेऊन आपल्या परिसरात जिल्ह्यात ज्या शेतमालाचे सर्वाधिक उत्पादन असेल त्यानुसार सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ घेऊन उद्योग उद्योग उभारता येतो.

यासाठी अर्ज कुठे करायचा ? पात्रता काय आहे ? अनुदान किती आहे ? या सर्वांची माहिती आज आपण जाणून घेणार आहोत.

**योजनेचा उद्देश**

१. सध्या कार्यरत असलेले व नवीन स्थापित होणारे वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग तसेच शेतकरी उत्पादक गट/संस्था/कंपनी, स्वयं सहाय्यता गट व सहकारी उत्पादक संस्था यांची पतमर्यादा वाढविणे.

२. उत्पादनांचे ग्रॅन्डींग व विपणन अधिक बळकट करून त्यांना संघटीत अशा पुरवठा साखळीशी जोडणे.

३. महाराष्ट्रातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना औपचारिक रचनेमध्ये आणण्या साठी सहाय्य करणे.

४. सामाईक सेवा जसे की साठवणुक, प्रक्रिया सुविधा, पॅकेजिंग, विपणन तसेच उद्योग वाढीसाठीच्या सर्वकष सेवांचा सूक्ष्म उद्योगांना अधिक लाभ मिळवून देणे.

५. अन्न प्रक्रिया क्षेत्रातील संशोधन व प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण यावर भर देणे.

६. सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांनी व्यावसायिक व तांत्रिक सहाय्याचा अधिकाधिक लाभ घ्यावा यासाठी प्रयत्न करणे.

समाविष्ट जिल्हे

महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्हे (मुंबई शहर व मुंबई उपनगर समाविष्ट)

**पात्र प्रकल्प**

एक जिल्हा एक उत्पादन (जऊउझ) नविन तसेच कार्यरत सुक्ष्म अन्न प्रक्रीया उद्योग.

एक जिल्हा एक उत्पादन व्यतिरिक्त (NON ODOP) नविन प्रक्रिया उद्यद्योग व कार्यरत उद्योगांचे विस्तारीकरण व स्तर वृध्दी करणे.

फळे, भाजीपाला, अन्नधान्य, कडधान्य तेलबिया, मसाला पिके, दुग्ध व किरकोळ उत्पादने, बेकरी तसेच स्नॅक्स आधारीत उत्पादने.

पात्र लाभार्थी

वैयक्तिक लाभ : वैयक्तिक मालकी/भागीदारी, शेतकरी उत्पादक संस्था (FPO) शेतकरी उत्पादन कंपणी सहकारी संस्था स्वयं सहाय्यता गट (SHG) गैर सरकारी संस्था खाजगी कंपणी (Pvt. Ltd. Companies) इत्यादी.

गट लाभ : शेतकरी उत्पादक संस्था / शेतकरी उत्पादक कंपणी, सहकारी संस्था, स्वयंसहायता गट आणि त्यांचे फेडरेशन MSRLM-CLF, M-VIM²- VLF, CMRC, NULM--LF), शासकीय संस्था.







**लाभार्थी निवडचे निकष**

**वैयक्तिक लाभ**

१) उद्योगामध्ये १० पेक्षा कमी कामगार कार्यरत असावेत.

२) अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे पेक्षा जास्त असावे.

३) एका कुटुंबातील एकच व्यक्ती पात्र असेल.

४) सदर उद्योगाला औपचारीक दर्जा प्राप्त करुन देण्याची तयारी असावी.

५) पात्र प्रकल्प किंमतीच्या किमान १० टक्के लाभार्थी हिस्सा देण्याची व उर्वरीत बँक कर्ज मुदत घेण्याची तयारी असावी.

**गट लाभार्थी**

१) ODOP तसेच ODOP साठीचे प्रस्ताव सहाय्यासाठी पात्र.

२) वार्षिक उत्पादन व अनुभवाची अट नाही.

३) पात्र प्रकल्प किमतीच्या किमान १० टक्के प्रवर्तकाचे योगदान.

४) पात्र प्रकल्प खर्चा मध्ये जमीन / भाडे किंवा भाडे तत्वावरील कामाच्या शेडची, किमंत समाविष्ट नाहीत.

५) पात्र प्रकल्प खर्चामध्ये तांत्रिक नागरी काम ३० टक्के पेक्षा जास्त नसावे.

**अर्थिक मापदंड**

वैयक्तिक लाभासाठी पात्र प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के व जास्तीतजास्त १० लाखापर्यंत बँक कर्जाच्या निगडीत अनुदान लाभ मार्केटिंग व ब्रडिंग साठी एकूण खर्चाच्या ५० टक्के रक्कम कमाल निधी मर्यादा केंद्र शासना मार्फत विहीत करण्यात यईल.

स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना बीज भाडल रु. ४०,०००/- प्रती सदस्य ग्रामिण व शहरी गटांसाठी सामाईक पायभूत सुविधा पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के अनुदान कामाल सहाय्यमर्यादा ३ कोटी.

मूल्य साखली पात्र प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के अनुदान कमाल सहाय्य मर्यादा ३ कोटी क्षमता बांधणी प्रशिक्षण १०० टक्के अनुदान.

अर्ज करण्याची पध्दत

वैयक्तिक लाभार्थी : www.pmfme.mofpi.gov.in या संकेत स्थाळावर ऑनलाईन अर्ज करावा.

गट लाभार्थी : www pmfme.mofpi.gov.in या संकेत स्थळावर अर्ज करावा.

**अधिक माहितीसाठी संपर्क कार्यालय–** जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, यांचे कार्यालय तसेच उपविभागीय कृषी अधिकारी/तालुका कृषी अधिकारी/मंडळ कृषी अधिकारी/कृषी पर्यवेक्षक/ कृषी सहाय्यक व जिल्हा संसाधन व्यक्ती.




# कपडे रोज धुता मात्र टॉवेल धुता का? किती वेळा धुतले पाहिजे टॉवेल

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

तुम्ही आंघोळीनंतर तुमचे टॉवेल धुता का? तसेच टॉवेल वापरण्याआधी ते किती स्वच्छ आहे हे पाहता का?हे दोन प्रश्न असे आहेत ज्यावर अनेकांचे उत्तर नाही असेच येईल. खरंतर फार कमी लोक असतील जे प्रत्येक वापरानंतर टॉवेल धुण्यासाठी मशीनमध्ये टाकत असतील. १०० लोकांवर करण्यात आलेल्या अभ्यासात असे समोर आले की साधारण एक तृतीयांश लोक महिन्यातून एकदा टॉवेल धुतात. काही लोक तर वर्षातून एकदा.



टॉवेलवर करण्यात आलेल्या अभ्यासात म्हटले आहे की ज्या टॉवेलचा आपण शरीर सुकवण्यासाठी ज्या टॉवेलचा वापर करतो त्यात असंख्य बॅक्टेयि असतात. आंघोळीनंतरही आपल्या शरीरावर अनेक बॅक्टेरिया असतात जे अंगावरून शरीरावर जातात. भारतात करण्यात आलेल्या अभ्यासात असे आढळले की केवळ २० टक्के लोक आपले टॉवेल आठवड्यातून दोन वेळा धुतात.

किती दिवसांत धुतले पाहिजे टॉवेल?

नियमितपणे टॉवेल धुण्याची सवय बॅक्टेरियल इन्फेक्शन कमी करण्यास मदत करते. आठवड्यातून कमीत कमी एक वेळा टॉवेल जरूर धुतले पाहिजे. दरम्यान,ज्यांना इन्फेक्शनचा त्रास आहे त्यांनी टॉवेल वेगळे ठेवावे.

# महानगरपालिका मध्य झोनची प्लास्टीक पन्नी जप्तीची मोहीम तीव्र

## शहरात ५ किलो प्लास्टीक जप्त, महानगरपालिका मध्य झोन ची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती –** शहरात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली असून या मोहिमेंतर्गत महानगरपालिकेने बंदी घातलेले ५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. महानगरपालिका मध्य झोनचे सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर यांच्या नेतृत्वात गांधी चौक ते इतवारा बाजार रोड परिसरात प्लास्टीक जप्ती मोहीम राबविण्यात आली. तसेच २ दुकानदारांकडून प्रत्येकी ५०००/- रुपये प्रमाणे १०,०००/- हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

शहरात महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी महापालिकेच्या माध्यमातून विशेष स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. या स्वच्छता मोहिमेंतर्गत प्लास्टिक मुक्त अमरावती करण्याचा संकल्प आहे.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व हाताळणी नियमाअंतर्गत अमरावती महानगरपालिकेने प्लास्टिक पिशवी जप्ती मोहीम प्रारंभ केली आहे.

गत काही दिवसांपासून महानगरपालिकेची सुरू केलेली ही कारवाई कायम सुरू राहणार असून प्लास्टिक जप्ती मोहीम अधिक तीव्र होण्याचे संकेत आहेत. शहरातील आस्थापनाकडे अनेकदा प्लास्टिक पन्नी आढळून येत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे अमरावती महानगरपालिकेने प्लास्टिकचा वापर करणाऱ्या आस्थापनांवर तसेच प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणाऱ्या दुकानांवर कारवाई करणे सुरू केले आहे.

या मोहीमेमध्ये मध्य झोनचे सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, स्वास्थ निरीक्षक धनीराम कलोसे, शैलेश डोंगरे, शक्ति पिवाल, अनिकेत फुके, जीवन राठोड, सचिन हाणेगावकर उपस्थित होते.



RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण

# विद्यापीठाच्या डीन, प्राध्यापक भरतीला पुन्हा दिली स्थगिती

## प्रशासनाने व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवले राज्यपाल कार्यालयाचे पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती–** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील दोन विद्याशाखांचे अधिष्ठाता (डीन) आणि वेगवेगळ्या विभागातील १३ प्राध्यापकांसह संलग्न महाविद्यालयातील रिक्त पदभरतीला कुलपती तथा राज्यपाल कार्यालयाने पुन्हा एकदा स्थगिती दिली आहे. त्यामुळे मुलाखतीच्या टप्प्यावर पोहोचलेली भरती प्रक्रिया अडचणीत आली असून विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांचे प्रशासन पुन्हा एकदा कोंडीत सापडले आहे.

शासनाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनइपी) प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठासह अनेक संलग्नित महाविद्यालयांना प्राध्यापकांची भरती करावयाची आहे. त्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून लढा सुरु होता.



या लढ्याची यशस्वीता म्हणून शासनाने दरम्यानच्या काळात परवानगी दिली. त्यानुसार महाविद्यालये आणि विद्यापीठ 'प्रशासनाने जाहिरात प्रकाशित करून अर्ज मागवले.

त्यानंतर अनेक ठिकाणी अर्जही प्राप्त झाले व भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली.या प्रक्रियेतील काही महाविद्यालयांनी मुलाखतीचा टप्पाही गाठला होता. परंतु आता पुन्हा २६ नोव्हेंबरला एक पत्र जारी करुन कुलपती कार्यालयाने या भरती प्रक्रियेला स्थगिती दिली. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अडचणीत आली आहे. हे पत्र अलिकडेच पार पडलेल्या व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आले. राज्यपाल कार्यालयाचे मुख्य सचिव प्रवीण दराडे यांच्यास्वाक्षरीनिशी जारी झालेल्या या पत्रानुसार पुढील सूचनेपर्यंत निवड-नियुक्ती प्रक्रिया थांबविण्यात आली आहे.विद्यापीठ कायदा कलम १०२, १०५ नुसार अमरावती विद्यापीठाने विज्ञान – व तंत्रज्ञान आणि मानव विज्ञान विद्या शाखेच्या अधिष्ठाता पदाची निवड प्रक्रिया सुरु केली आहे.

यासाठी अर्ज – मागवून ही प्रक्रिया सध्या मुलाखतीच्या टण्यावर पोहोचली होती. त्याचवेळी विद्यापीठाच्या व विविध विभागात रिक्त असलेल्या प्राध्यापकांच्या १३ जागा भरण्याचीप्रक्रियाही सुरु करण्यात आली होती. याच धर्तीवर विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अनेक महाविद्यालयांमध्येही भरती प्रक्रिया सुरु झाली होती. परंतु ती प्रक्रिया अगदी मुलाखतीच्या टप्प्यावर पोचली असतानाच राज्यपाल कार्यालयाने भरतीला स्थगिती दिली. त्यामुळे या पदांसाठी इच्छुक असलेल्या उच्च शिक्षितांच्या नियुक्त्या अडचणीत आल्या आहेत.

### विद्यापीठात प्रभारी राज

सद्या विद्यापीठात अनेक पदांवर प्रभारी राज आहे. चारपैकी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता पद प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. तर मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठातापद डॉ. मोना चिमोटे यांनी सांभाळले आहे. वाणिज्य व व्यवस्थापन आणि आंतरविद्याशाखा या दोन – विद्याशाखांचे अधिष्ठातापद अनुक्रमे डॉ. डी. डब्ल्यू निचत आणि डॉ. वैशाली गुडधे यांच्याकडे आहे.

# ७७ वर्षीय वृद्धेला अमानुष मारहाण करीत गावातून काढली धिंड

## जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन आपबीती केली कथन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ चिखलदरा :** जादूटोण्याच्या संशयावरून तालुक्यातील रेहट्याखेडा येथील ७७ वर्षीय वृद्धेला अमानुष मारहाण होत असताना, तिची गावातून धिंड काढली जात असताना अखखे गाव मात्र बघत होते.



परंतु, कोणीच आडवे आले नाही. तर दुसरीकडे याप्रकरणात चिखलदरा पोलिसांनी मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली. दरम्यान काळमी नंदराम शेलूकर या पीडितेसह तिचा मुलगा व सुनेने शुक्रवारी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन आपबीती कथन केली. वृद्धेला मानवी व कुत्र्याचे मूत्र पाजल्याचा आरोप केला. त्यामुळे या प्रकरणात 'महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अघोरी व दुष्कर्मी प्रथा आणि काळा जादू २०१३ अर्थात अंधश्रद्धा आणि जादूटोणा विरोधी कायद्यातील तरतुदीनुसार कलम वाढ केव्हा? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



ती महिला तिच्या कुटुंबासह शुक्रवारी मला भेटली. तिची कैफियत जाणून घेतली. पीएसओंकडून संपूर्ण घटनाक्रम ऐकून व्हेरिफाय करू. त्यानंतर, पुढील कायदेशीर कारवाई वा कलमवाढ निश्चितपणे करण्यात येईल.

**विशाल आनंद,**
**पोलिस अधीक्षक**

आमच्या चार एकर शेतात थेट अंगणवाडी बांधकाम पोलिस पाटलाने केल्याचा आरोपही राजकुमार नेदुराम शेलूकर व शामू राजकुमार शेलुकर यांनी तक्रारीत केला आहे. ग्रामस्थांकडून मारहाण झाल्यानंतर काळमी यांनी मुलीच्या घरी सिनोरी येथे आश्रय घ्यावा लागला. रेहट्याखेडा येथे दाखल झालेले राजकुमार व शामू यांना सिनोरी येथे ती मिळाली. पासपोर्ट फोटो)

# जिल्ह्यात १,७६१ शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या

## कार्यमुक्तीचे आदेश ३० एप्रिल रोजी मिळणार

## सीईओ संजिता महापात्र यांचे आदेश जारी

## १ मे रोजी रुजू न झाल्यास होणार कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती –** अमरावती जिल्ह्यात १२नोव्हेंबरपासून सुरू झालेली जिल्हांतर्गत बदली प्रक्रिया ३१ डिसेंबरला आटोपली. यामध्ये एकूण १ हजार ७६१ शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. या शिक्षकांना वेळापत्रकाप्रमाणे २ जानेवारीला आदेश देणे क्रमपात्र होते. परंतू शैक्षणिक सत्र हे ३० एप्रिल रोजी संपत असल्याने कार्यमुक्तीचे आदेश ३० एप्रिल रोजीच देण्याबाबतच्या सुचना सीईओंनी दिल्या आहेत. या शिक्षकांना १ मे रोजी बदलीच्या ठिकाणी पदस्थापना घ्यावी लागणार आहे.




जिल्हा परिषद शिक्षकांची बदली प्रक्रिया न्यायप्रविष्ट असताना उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचे एकूण १२ पिटीशन मधील ४ डिसेंबर २०२३ चे अंतीम निर्णयान्वये ऑनलाईन बदली पोर्टलवर रिक्त जागा दर्शविणे व त्यांची मेळघाट क्षेत्रातून सर्वसाधारण क्षेत्रात बदली करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यामुळे जिल्हा परिषदेकडून १२ नोव्हेंबर पासून बदली प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली. ३१ डिसेंबर पर्यंत सुरू असलेल्या या बदली प्रक्रियेत एकूण १,७६१ शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. १७ दिवस लोटत असताना अद्यापही या शिक्षकांचे कार्यमुक्तीचे आणि पदस्थापनेचे आदेश मिळाले नव्हते. त्यामुळे विक्षकांमध्ये संभ्रम निर्माण झाल होता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ हे दिनांक ३० एप्रिल रोजी संपुष्टात येतअसून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याकरीता बदली झालेल्या शिक्षकांना ३० एप्रिल रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त करण्यात यावे. तसेच १ मे रोजी स्थानांतरणाने पदस्थापनेच्या शाळेत रूजू होऊन तसा अहवाल सादर करावा, असे आदेश सीईओ संजिता महापात्र यांनी शुक्रवारी दिले आहे. बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त केल्यानंतर ते दुसऱ्या दिवशी पदस्थापनेच्या शाळेत हजर न झाल्यास ते शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येणार आहे. यामध्ये सन २०२४ चे जिल्हांतर्गत बदली मधील ज्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये याचिकाकर्त्यांची बदली करण्यात येऊ नये किवा बदलीस स्थगिती देण्याबाबत उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत, असे शिक्षक वगळता अन्य शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात यावे अशी सुचना देखील देण्यात आली आहे.

# बहिरम यात्रेत रंगणार बैलगाडा शर्यतीचा धुराळा

## २१ ते २३ जानेवारीला प्रहारच्या वतीने जंगी शंकरपट

### दुचाकी वाहनांसह लाखोंची बक्षिसे

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१८अमरावती**
विदर्भातील सर्वात जास्त काळ चालणारी ऐतिहासिक व पुरातन असलेल्या बहिरम बाबा यात्रा महोत्सवात २१ ते २३ जानेवारी दरम्यान प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जंगी शंकरपटाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रहारच्या शंकरपटाची पंचक्रोशीतील नागरिक आतुरतेने वाट बघत असतात. यावर्षी विजेत्या स्पर्धकांना दुचाकी वाहनांसह लाखो रुपयांची बक्षिसे



देण्यात येणार आहे. बच्चू कडू यांच्या संकल्पनेतील हे आयोजन असून मागील वीस वर्षांपासून निरंतर हे आयोजन सुरू आहे.

२१ जानेवारी रोजी या जंगी शंकरपटाचे उदघाटन असून माजी आ. राजकुमार पटेल, उपविभागी य अधिकारी बळवंत अरखराव, शल्यचिकित्सक डॉ. प्रभुजी जवंजाळ, चांदुर बाजार येथील तहसीलदार रामदास शेळके, ठाणेदार महेंद्र गवई, गटविकास अधिकारी नारायण आमझरे यांच्या प्रमुख उपस्थितीत या शंकरपटाचे उदघाटन होणार आहे. वीस वर्षांपासून निरंतर बच्चू कडू या यशस्वी शंकरपटाचे आयोजन करत असून विदर्भात या शंकर पटाचा नावलौकिक आहे. दूरवरून या शंकरपटात स्पर्धक सहभागी होतात हे विशेष.

### शंकरपटाच्या स्पर्धकांना दुचाकी



वाहने व लाखोंची बक्षिसे देण्यात येणार आहेत. २३ जानेवारी रोजी अमरावती मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, संचालक नरेशचंद्र ठाकरे, जयप्रकाश पटेल, सुनिलभाऊ वऱ्हाडे, अजय मेहकरे, आनंदभाऊ काळे, चित्रा प्रशांत डाहाणे, यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे. तरी या जंगी शंकरपटात सहभागी होण्याचे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी केले

# ३ फरार; तलवार, लोखंडी रॉड, मिरची पूड, ३ दुचाकी जप्त

## घातक शस्त्रांनिशी दरोड्याच्या उद्देशाने फिरणारे तिघे ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ परतवाडा**
परतवाडा शहरातील एलआयसी चौक ते कोर्ट रोड मार्गावरील राजे शिवाजी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या पुलानजीक संशयितरित्या सहा युवक फिरत असल्याचे दिसताच गस्तीवर असलेल्या पथकाने यातील तिघांना ताब्यात घेतले असून, तिघे फरार झाले. या तिघांजवळून अत्यंत घातक शस्त्र, दोन तलवारी, एक लोखंडी रॉड, धारदार चाकू, लाकडी काठी, मिरचीपूड, दोरीचा गुंडाळा व तीन दुचाकी वाहने जप्त करण्यात आली.परतवाडा शहरात रात्री २ ते ३ च्या सुमारास पोलिसांचे पथक गस्त घालत असताना घातक शस्त्रांनिशी दरोड्याच्या उद्देशाने फिरत असलेले राहुल उर्फ कालू घनश्याम यादव (२९), पंकज सुरेश शिंदे (२८) कृष्णा हेमंत मेश्राम (१९) या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. तर फरार आरोपींमध्ये पवन शिशुपाल परिवाले (३०), अनिकेत उर्फ रितीक राजू नहारकर (२१), सोहेल उर्फ खबीज, सदर बाजार यांचा समावेश आहे. सपोनि सुदर्शन बिरादार व त्यांच्या पथकाने या तिघांना घातक शस्त्रांनिशी ताब्यात घेत एकूण २ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करत आहेत.

## कर्ज मिळवून देण्यासाठी फसवणूक

# बॅंक कर्मचाऱ्याने पाच लाख हडपले

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१८अमरावती–** कर्ज मिळवून देण्याच्या नावाखाली पाच लाख रुपयांची फसवूणक केल्याप्रकरणी स्टेट बँकेच्या कर्मचाऱ्याविरुध्द सिटी कोतवाली गुन्हा दाखल केला आहे. स्टेट बँकेच्या कॉटन मार्केट शाखेतील महिला कर्मचाऱ्याने आपली फसवणूक केल्याची तक्रार मनीष मनोहर तिलंगे (रा औरंगपुरा अमरावती) यांनी सिटी कोतवाली पोलिसांकडे केली. त्यानुसार प्लॉट खरेदीसाठीपैसे कमी पडत असल्यानेत्यांनीकजीची मदत मागितली असता, आरोपीने कर्ज मंजूर देण्यासाठी पैशाची मागणी केली. त्यानुसार त्यांनी पाच लाख पाच हजार रुपये बँकेत जमा करण्याच्या नावावर घेतले. मात्र बँकेत जमा केले नाही, आणि स्वतः वापरले. २ सप्टेंबर २०२३ ते १६ जानेवारी २०२५ यादरम्यान हाप्रकार घडला. पोलिसांनी आरोपी कर्मचारीविरुध्दकलम ४०६- ४२० नुसार गुन्हा दाखल केला

# महावितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी घेतला अमरावती परिमंडळाचा आढावा

## शंभर टक्के विजबिलाच्या वसुलीसाठी मोहिम राबविण्याचे दिले निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती–**
मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना, सौर ग्राम योजना शासनांच्या या विविध महत्वाकांक्षी योजनांची परिमंडळात प्रभावी अंमलबजावणी करा, तसेच विजबिलाची १००% वसुलीसाठी मोहिम राबवा असे स्पष्ट निर्देश संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांनी दिले.

विद्युत भवन अमरावती येथे परिमंडळाअंतर्गत झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी, अधीक्षक अभियंता दीपक देवहाते, दिपाली माडेलवार, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधूसुदन मराठे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) प्रदिप पुनसे, अमित शिवलकर, वरिष्ठ व्यवस्थापक विजय पचारे यांच्यासह अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

### वीज वाहिन्या विलगीकरणाची कामे उद्धीष्टानुसार वेळेत पूर्ण करा

महावितरणच्या आर.डी.एस.एस. योजनेत परिमंडळाअंतर्गत गावठाण आणि कृषी वाहिनी विलगीकरणाची कामे सुरू आहेत. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ५३ आणि यवतमाळ जिल्ह्यातील १५२ वाहिन्यांचा समावेश आहे. परिमंडळात मे. पॉलीकॅब लि.या कंत्राटदारामार्फत हे काम अत्यंत संतगतीने सुरू असल्याने दिलेल्या उद्धीष्ठानुसार ही कामे पुर्ण वेळेत पूर्ण करण्यासंदर्भात आढावा दरम्यान कंत्राटदारांना निर्देश दिले.



यावेळी परिमंडळाअंतर्गत अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्याचा जिल्हानिहाय आढावा घेतांना संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे म्हणाले की, महावितरणची दर महिन्याच्या वीजबिलाची वसुली १००% होणे अपेक्षीत आहे. तथापि अमरावती परिमंडळाची सरासरी वसुली मागील आठ महिन्यात फक्त ९४% आहे. त्यामुळे प्रत्येक महिन्याला महावितरणच्या थकबाकीत वाढ होत आहे. विजबिलाच्या वसुलीला पर्याय नसल्याने महावितरणच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांनी प्रशासनाने आपल्याला दिलेली जबाबदारी ओळखून काम करावे अथवा कारवाईसाठी तयार रहावे असे स्पष्ट आदेश यावेळी त्यांनी दिले.

**वितरण हानी कमी करण्याचे आव्हान–**
वितरण हानी कमी करण्याचे परिमंडळात मोठे आव्हान आहे. त्यामुळे वीज चोरीवर विशेष लक्ष केंद्रीत करा. वीज चोरांवरती गुन्हे दाखल करा. वीज चोरी विरोधात राबवित असलेल्या मोहिमेत सातत्य राखा. वीज चोरी हा फौजदारी गुन्हा आहे हे ग्राहकांचया लक्षात आणून द्या. तसेच कायमस्वरूपी ग्राहकांची प्राधान्याने तपासणी करा, अनाधिकृत वीज पुरवठा आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करा असे स्पष्ट निर्देश यावेळी त्यांनी दिले.

# ‘नाव घेते, सोडा माझा पदर’ ; चित्रा वाघ यांचा धम्माल उखाणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८गोंदिया :**
दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीच्या जनतेला दिलेली आश्वासने आधी पूर्ण करावी. तेथील सध्या होत असलेल्या निवडणुकीत तर त्यांचीच तळ्यात मळ्यात सारखी स्थिती झाली आहे. त्यांनी आपली तब्येत आणि पक्ष सांभाळावा. महाराष्ट्रातील नेतृत्व खंबीर आहे आपले राज्य सांभाळायला आणि सैफ अली सारख्या प्रकरणाचा नायनाट करायला. केजरीवाल यांनी आपल्या सरकारचे उरलेले मोजके दिवस बद्दल विचार करावा, असे मत भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांनी केले.

त्या आज शुक्रवारी देवरी येथे जिल्हा परिषद महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम यांच्याद्वारे आयोजित भाजपच्या महिला सदस्या नोंदणी अभियान व हळदी कुंकू कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आले असता माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात बोलत होत्या. मुंबईत सैफ अलीवर झालेल्या हल्ल्यानंतर दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी हा हल्ला गुजरातच्या कारागृहात असलेल्या बिश्नोई गँग कडून सरकार पुरस्कृत असल्याचा



आरोप केला होता. राज्यात महायुतीचे फडणवीस सरकार आल्यानंतर बीड जिल्ह्यातील सरपंचाची निर्घृण हत्या प्रकरण आणि काल अभिनेता सैफ अली खान वर रात्री त्यांच्या राहत्या घरी झालेला हल्ला यावर विरोधकाकडून राज्यात कायद्याचे राज्य नसल्याचा आरोप केला जात आहे.या प्रश्नावर उत्तर देताना चित्रा वाघ म्हणाल्या, की बीडच्या सरपंच हत्याप्रकरणी आरोपीवर मकोका लावण्यात आलेला आहे. प्रकरणाच्या तपास पण सीआयडी आणि एसआयटी कडे देण्यात आलेला आहे आणि या प्रकरणात कितीही मोठा माणूस गुंतलेला आढळून आल्यास त्याला शिक्षा होणारच याबाबतची हमी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेलीच आहे. तसेच अभिनेता सैफ अली यांच्यावर झालेल्या हल्ल्या संदर्भात पण गुरुवारी दिवसभर मुंबई पोलिस तपास यंत्रणा कामाला लागलेली होती. पोलिसांना थोडा वेळ दिला गेला पाहिजे. काय झालं, कोण आलं, कशासाठी आलं, कोणासाठी आलं या सगळ्यांची उत्तर पोलीस तपासातून समोर येणारच आहे. पटकन विरोधकांकडून सरकारवर टीका टिप्पणी करणे हे माझ्या मते योग्य नाही. मुख्यमंत्र्यांनी पण या संदर्भात आपली भूमिका मांडलेली आहे. पण या घटनेमुळे महाराष्ट्रात कुठेतरी भीतीचे वातावरण तयार करायचं आणि आता महाराष्ट्र सुरक्षित नाही, मुंबई सुरक्षित नाही असं म्हणणे योग्य नाही. संजय राठोड प्रकरणी महाविकास आघाडीचे उध्दव सरकार कुणाचे एकत नव्हते, काहीही बोलत नव्हते त्यामुळे मला आवाज बुलंद करणे गरजेचे वाटले त्यामुळे त्यावेळी मी ते केलं पण बीड प्रकरण हे वेगळं असल्याचे मत चित्रा वाघ यांनी व्यक्त केले.

### हळदी कुंकू कार्यक्रम

देवरी येथील भाजपच्या सदस्यता नोंदणी अभियान आणि हळदीकुंकू कार्यक्रमात आपल्या संबोधनानंतर उपस्थित महिलांच्या आग्रहा खातर भाजपच्या महिला प्रदेश अध्यक्ष आमदार चित्रा वाघ उखाणा घेत म्हणाल्या की‘इंग्रजीत वडिलाला म्हणतात फादर आणि आईला म्हणतात मदर.. ईश्वररावांचे नाव घेते सोडा माझा पदर’

# एसएमएसच्या विषाक्त पाण्यामुळे घराघरात वाढले आजार

## सरकारी,खासगी रुग्णालये हाऊसफुल्ल ,पोटदुखी, अतिसार सारख्या आजारांनी नागरिक त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नांदगाव पेठ–**
गोल्डन फायबर मधील दोनशे कामगारांच्या विषबाधा प्रकरणानंतर आता नांदगाव पेठ व आजूबाजूच्या गावातील घराघरात पोटदुखी, अतिसार सारख्या आजारांत वाढ झालेली आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनाच साथीच्या आजाराची लागण झाली असुन हे सर्व प्रकार पिण्याच्या पाण्यातून होत असल्याचा अंदाज आहे.साथीच्या रुग्णांमुळे गावातील सरकारी व खासगी रुग्णालये हाऊसफुल्ल असून यावर तोडगा काढण्यात आरोग्य प्रशासन अपयशी ठरल्याचे दिसून येत आहे. एमआयडीसीमध्ये असलेल्या कारखान्यांमध्ये एकदा वापरलेल्या दूषित पाण्यावर पुन्हा प्रक्रिया करून ते पाणी शुद्ध करून तीन ते चार वेळा त्या पाण्याचा वापर केला जातो. हे पाणी शुद्ध करण्याची प्रक्रिया एमआयडीसीमधील एसएमएस कंपनी करत असून प्रक्रिया केल्यानंतर केमिकलयुक्त व विषाक्त घटक असलेले पाणी हे प्रकल्पाच्या बाहेर सोडण्यात येते.



त्यामुळे हे पाणी आता गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या जलस्रोतांमध्ये शिरलेले असून हळूहळू हे विषारी घटक पिण्याच्या पाण्यातून प्रत्येक नागरिकांच्या शरीरात शिरत आहे. एकंदरीत या विषाक्त पाण्यामुळे गावकऱ्यांना स्लो पॉईजन मिळत असून भविष्यात दुर्धर आजारांसह मृत्यूला आमंत्रण देण्याची परिस्थिती आज निर्माण झाली आहे. गावकऱ्यांच्या आक्रोशा नंतर नांदगाव पेठ ग्रामपंचायतने या बाबीची दखल घेतली असुन जिल्हाधिकारी यांना लेखी पत्र देण्यात आले आहे.यामध्ये एसएमएस कंपनी ही विषाक्त पाणी जलस्रोतांमध्ये सोडत असल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी सरपंच कविता डांगे, उपसरपंच मजहर खा, सफदर खा, ग्रामपंचायत अधिकारी हर्षदा बोंडे, ग्रा.पं. सदस्य छत्रपती पटके, बाळासाहेब राऊत यांनी केली आहे. तसेच संबधीत विभागांना देखील प्रतिलिपी देण्यात आली आहे.

### पाण्याचे नमुने घेऊन उपाययोजना सुरू

दोन दिवसात अनेक साथीच्या रुग्णांची नोंद झाली असून गावातील पिण्याच्या पाण्याचे स्रोत असलेल्या ठिकाणचे पाण्याचे नमुने घेऊन ते प्रयोग शाळेत तपासणी साठी पाठविण्यात आले.सोबतच पाणी निर्जंतुकीकरण करण्यासाठी ग्रामपंचायतला माहिती देण्यात आली. रुग्णांना सुरू असलेले पोटदुखी, अतिसार यासंदर्भात रुग्णांची तपासणी करून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने उपाययोजना देखील करण्यात आल्या.

**डॉ. स्नेहा राऊत**वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र माहुली

# मोदी आवासला मुहूर्त मिळणार तरी कधी ?

## सन २०२४-२५ च्या वाढीव उद्दिष्टांचे लाभार्थी प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती :**



जिल्ह्यात मोदी आवास अंतर्गत पहील्यावर्षी १४ हजारांवर नागरीकांना घरकुल मंजुर झाले. परंतु सन २०२४-२५ च्या उद्दिष्टांना वर्ष लोटत असताना अद्यापही मुहुर्तच मिळाला नाही. लोकसभेनंतर विधानसभेची निवडणुक देखील आटोपली परंतु. या योजनेचे उद्दिष्ट अप्राप्त असल्याने लाभार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.शासनाने मोदी आवास योजना सन २०२३-२४ पासून सुरू केली. जिल्ह्यात ओबिसींच्या लाभार्थ्यांचे लाखोंच्या संख्येने घरकुलाचे प्रस्ताव रखडले होते. त्यामुळे मोदी आवास योजनेत पहील्याच वर्षी १४ हजार १७८ घरकुलाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. जिल्हा ग्रामिण विकास यंत्रनेने तातडीनेसर्वच घरकुलांना मंजुरात देत घरकुलांच्या कामाला देखील गतीने सुरूवात केली. परंतु याच प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांना आता सन २०२४-२५ मध्ये घरकुल मिळण्याची अपेक्षा वाढली. मार्चनंतर आपल्याही घरांचे स्वप्न पुर्ण करण्याच्या आशेवर असताना मध्येच लोकसभा निवडणुक लागली. यामध्ये वर्षातील अडीच ते तीन महीने निघुन गेले. त्यानंतर शासनाकडे अडीच महीने शिल्लक असताना मोदी आवासकडे दुर्लक्ष करीत शासनाने इतर आर्थिक लाभाच्या योजनाकडे लक्ष केंद्रीत केले. नंतर मात्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहीता लागली. आता निवडणुकीची आचारसंहिता संपुर्ण महीना लोटला आहे. आर्थिक वर्ष सुरू होवुन ९ महीने लोटले आहेत. केवळ तीन महीने शिल्लक असून अद्यापही मोदी आवासचे उद्दिष्ट मिळाले नाही. त्यामुळे यंदाचे १४ हजार घरकुल केव्हा मिळणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# नेरपिंगळाईत महीलांकरीता प्रसाधन गृह नसल्याने महिला त्रस्त

## गंभीर समस्या लाडकी बहीण सरपंच व ग्रामसेवक लक्ष देणार का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नेरपिंगळाई–** गावात मुख्यरस्त्यांवर महीलान करीता प्रसाधन गृह नसल्याने महिलांचे हाल नविन प्रसाधन गृहा करीता गावच्या सरपंच्या व ग्रामसेवक मनवर साहेब घेणारं का मनावरनेरपिंगळाई..गाव आजूबाजुच्या खेड्यांची बाजारपेठ असल्याने गावामध्ये अनेक महिला आरोग्याची समस्या असल्यास प्राथमिक आरोग्य केंद्रात कीवा लाडकी बहिण चे पैसे काढायचे असल्यास बँके मदध्ये किवा सेतु केंद्रात सोनेचांदी विकत घ्यायचे असल्यास सोनाराच्या दुकानात कपडा खरेदी करायची असल्यास कापड दुकानात किवा सुपरबाजार किंवा किराणा




दुकानात किराणा खरेदी करण्यास मोठ्या प्रमाणात येतात त्यात गावात येजा करतांना अनेक महिला बाहेर गावा वरून तिवसा चांदुरबाजार रत्यावरून येजा करतात मात्र या रस्त्यावर योग्य प्रसाधन गृह नसल्याने आहे ते देखील प्रमाणापेक्ष्या घाणीचें साम्राज्य राहत असल्याने व आहे ते देखील बसस्थानक परिसरात असल्याने अनेक महिला प्रसाधन गृह नस्ल्याने त्रस्त झाल्या आहे गावात योग्य प्रसाधन गृहाची गरज असून ते उपलब्ध करून द्यावे त्यात गावात लाडकी बहिन महिला सरपंच असल्याने त्यांनी ही समस्या जाणून घेणे गरजेचे आहे तर गावातील ग्रामसेवक मनवर साहेब यांनी सुद्धा ही समस्या मणावर घेऊन समस्या चे योग्य निवारण करून तोडगा काढावा अशी मागणी गावकरी करीत आहे

# संत गाडगेबाबा ट्रॅव्हल्सची अवैधरित्या प्रवासी वाहतूक

## नागरिकांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना दिले निवेदन, २४ जानेवारीला जनआंदोलन करण्याच्या तयारीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नांदगाव पेठ**
मागील अनेक वर्षापासून गाडगेबाबा ट्रॅव्हल्स पूर्णतः नियमबाह्य व अवैधरित्या प्रवासी वाहतूक करत आहे. तात्पुरते परमिट काढून सदर ट्रॅव्हल्स टप्पा वाहतूक करत असून प्रत्येक थांब्यावर प्रवासी घेऊन दादागिरी करत व्यवसाय करत आहे. अनेकवेळा प्रादेशिक परिवहन विभागाला निवेदन देऊन सुद्धा विभागाने गाडगेबाबा ट्रॅव्हल्सवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्याने अखेर गावकऱ्यांनी आरटीओंना स्मरणपत्र देत जनआंदोलन करण्याचा इशारा दिला दिला आहे. गाडगेबाबा ट्रॅव्हल्सचे मालक अशोक रेवस्कर हे प्रादेशिक परिवहन विभागाकडून केवळ १० ते १५ दिवसांचा टि.पी. परवाना काढतात मात्र संपूर्ण महिनाभर अमरावती ते मोर्शी अशा सतत फेऱ्या मारून अवैध वाहतुक करतात.पंचवटी अमरावती येथे ३० मिनीटे वाहन थांबवुन बस क्र. एम.एच.२७-बी. एक्स १५४३, एम.एच.२७-बी.एक्स ३४३५,एम.एच.१४ एच.जी. ३६४६, एम.एच. २७-ए ९६१४ या क्रमांकांच्या प्रवासी बस मध्ये प्रवासी जनावरांसारखे कोंबुन नांदगांव पेठ, माहुली, वाघोली, डवरगांव, चिचखेड, करजगांव, शिरजगांव फाटा, गोराळा, सावरखेड, लेहगांव,



शिरखेड, निंभी, येरला, मोर्शी ह्याप्रमाणे प्रत्येक स्टॉपवरून प्रवासी चढउतार करतात.दिवसभर प्रादेशिक परिवहन विभागांच्या नियमांची चिरफाड करत अशोक रेवस्कर आपण पोलीस दलात अधिकारी असल्याची बतावणी करून इतर प्रवासी वाहन चालक, मालकांना जीवे मारण्याची धमकी देऊन स्वतःचे सर्व वाहने चालवतात मात्र इतर वाहनांना संधी मिळत नसल्याने अनेकांना हा व्यवसाय सोडण्यास रेवस्कर प्रवृत्त करत असल्याचा आरोप अक्षय पांडे, पप्पू चोपडे,राजू वानखडे, अंबादास राऊत व गावकऱ्यांनी केला आहे. रेवस्कर यांच्या प्रवासी वाहनांना आरटीओ कडून अभय मिळत असून त्याबदल्यात आरटीओ विभागाला मोठी रक्कम मिळत असल्याचा आरोप सुद्धा तक्रारकर्त्यांनी केला आहे. नियमाने प्रवासी वाहतूक व्हावी एवढीच निवेदनकर्त्यांची विनंती आहे मात्र अश्या अवैध प्रवासी वाहतुकीला आरटीओ विभाग सहकार्य करत असेल तर आम्हाला जनआंदोलनाशिवाय पर्याय नसल्याचे निवेदनकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आरटीओ विभागाने या अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालावा अन्यथा २४ जानेवारीला जनआंदोलन करण्याचा इशारा निवेदनकर्त्यांनी दिला आहे.

# परतवाड्यात ‘एक गाव, एक विहार, एक रविवार’ अभियान, ग्रंथ वाचकांची कार्यशाळा व सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८परतवाडा–** ’एक गाव, एक विहार, एक रविवार धम्म अभियान’ या संकल्पनेंतर्गत ग्रंथ वाचकांची कार्यशाळा व सत्कार सोहळा परतवाडा येथील शासकीय विश्रामगृह येथे पार पडला.

अष्टमार्ग फाउंडेशनचे संचालक कैलास घोडेस्वार यांनी या अभियानामार्फत दर रविवारी एकत्र येऊन समाजहितासाठी चिंतन करण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे बुद्ध, धम्म व संघ या तीन रत्नांचा अभ्यास करूनच समाजापुढे प्रबोधन केले पाहिजे, असे मत नागपूर येथील धम्मप्रचारक धम्मपाल आवडे यांनी व्यक्त केले. बिहाली विपश्यना केंद्राचे अध्यक्ष धम्मचारी मनायु यांनी सांगितले की, धम्म चळवळ गतिमान करण्यासाठी उपसकांनी प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. यावेळी क्षितीजा दिलीप गवई हिने तुम्ही खाता, त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे रे... हे गीत सादर केले. उल्लेखनीय धम्मकार्याबद्दल धम्मपाल आवळे, कैलास घोडेस्वार, दादाराव सोनवणे, दिलीप गवई, देवराव चोटपगार, सुनील सदाशिव, मनोज मेळे, प्रदीप गवई, रमेश मेश्राम, आशा भटकर, राजीव जाधव यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन तक्षशिला बौद्ध विहार समितीचे अध्यक्ष विनोद सदाशिव, प्रास्ताविक राजीव जाधव, संचालन नितेश वानखडे, तर आभार प्रदर्शन मनोज मेळे यांनी केले. कार्यशाळेला धम्मप्रचारक डॉ. वझरकर, सुनील सदाशिव, निलेश वर्दे, रमेश मेश्राम, निरंजन डोंगरे, प्रदीप गवई, कृष्णराव वानखडे, निलेश वानखडे प्रकाश तायडे, सुलोचना वानखडे, शारदा वानखडे, वनमाला वानखडे, अंजली जंजाळ, वर्षा वानखडे, पुष्पा भटकर, सुशीला थोरात, अरुणा गवळी आदी उपस्थित होते.

# घरातील एकाच व्यक्तीला मिळणार पीएम किसानचे पैसे; बाकीच्यांचा पत्ता होणार कट!

## केंद्र शासनाची नियमावली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती :** पीएम किसान योजनेअंतर्गतशेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपयांचा लाभ दिला जातो. यामध्ये घरातील शेती कुटुंबातील अनेकांच्या नावे असल्याने त्या सदस्यांना लाभ मिळतो. यामध्ये पती, पत्नी, मुलगा, मुलगी आदी या योजनेचा लाभ घेतात. आता या योजनेसाठी केंद्र शासनाने नवीन नियमावली लागू केली आहे. त्याअंतर्गत एकाच कुटुंबातील पती, पत्नी, मुलगा, मुलगी लाभ घेतल्यास फक्त एका




व्यक्तीलाच या योजनेचा लाभ दिल्या जाणार आहे.शेतकऱ्यांना आर्थिक मदत व्हावी, या उद्देशाने पंतप्रधान किसान सन्मान योजनेचा लाभ दिला जातो. डिसेंबर २०१८ पासून यायोजनेची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे. या योजनेचे आतापर्यंत १८ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेले आहेत. जिल्ह्यातही २.७८ लाख शेतकऱ्यांना १८ व्या हप्त्याचा लाभ मिळाला आहे. सुरुवातीला योजनेत नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला. मात्र, या योजनेत अपात्र शेतकरी योजनेचा लाभ घेत असल्याचे निदर्शनात आल्यात आल्याने ई-केवायसी व आधार लिंकिंग अनिवार्य करण्यात आलेली आहे.

# नांदगाव पेठ ते श्री क्षेत्र शेगाव करिता पायदळ वारी रवाना

## असंख्य वारकऱ्यांचा सहभाग,ठिकठिकाणी पालखीचे स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नांदगाव पेठ –**
नांदगाव पेठ ते श्री क्षेत्र शेगाव करिता येथील वारकऱ्यांची पायदळ गुरुवारी रवाना झाली.सकाळी ग्रामप्रदक्षिणा करून संत काशीनाथ धाम येथून दुपारी १२ वाजता ही पायदळ वारी मार्गस्थ झाली. ठिकठिकाणी पालखीचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. पायदळ वारीमध्ये परिसरातील असंख्य वारकऱ्यांचा सहभाग आहे.

संत काशीनाथ बाबा धाम नांदगाव पेठ ते संत गजानन महाराज मंदिर शेगाव असा वारीचा मार्ग असणार आहे. १६ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता वारकरी भाविकांनी ग्रामप्रदक्षिणा घालून संत काशीनाथ महाराज आणि संत गजानन महाराज यांची पालखी येथून दुपारी संत काशीनाथ महाराज धाम याठिकाणी पोहचली.

त्याठिकाणी संत काशिनाथ महाराज ऑटो युनियनच्या वतीने वारकरी भाविकांना चहा व नाश्ता वाटप झाल्यानंतर तेथून ही पायदळ वारी शेगाव करिता रवाना झाली.टाकळी, रेवसा मार्गे



माऊलींचे नामस्मरण करीत वलगाव येथे मुक्काम करून तेथून पालखी पुढे पुढे मार्गक्रमण करणार आहे. ठीकठिकाणी पालखीचे भक्तांच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे. वारकऱ्यांच्या चहापाण्याची,राहण्याची व जेवणाची विविध ठिकाणी व्यवस्था देखील करण्यात आली आहे.२१ जानेवारी रोजी ही पायदळ वारी श्री क्षेत्र शेगाव येथे पोहचणार असून त्याठिकाणी श्रींचे दर्शन घेऊन तसेच मंदिराला प्रदक्षिणा घालून महाप्रसादानंतर वारकरी २२ जानेवारी ला परत येणार आहे.संत काशीनाथ महाराज संस्थान चे शिवराजसिंह राठोड, विपुल पालिवाल, संदीप यावले व रुपेश पोटफोडे यांचेसह भक्तमंडळी या सुरक्षित वारीसाठी प्रयत्नशील आहेत.

# संघ घेणार भाजप मंत्र्यांचा क्लास

## मोदी, शाह यांच्यानंतर मंत्र्यांना कानमंत्र, दोन दिवस बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शिर्डीतील पक्षाच्या अधिवेशनाच्या निमित्ताने भाजपच्या मंत्र्यांची बैठक घेऊन त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा सांगितल्या होत्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी मुंबईत महायुतीचे मंत्री, आमदारांचा क्लास घेतला होता. आता दोन दिवस रा.स्व.संघाचे ज्येष्ठ पदाधिकारी भाजपच्या मंत्र्यांची बैठक घेऊन कानमंत्र देणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे दोन्ही दिवस बैठकीला उपस्थित राहतील. राज्यात महायुतीचे सरकार देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सत्तारुढ झाल्यानंतर संघ आणि भाजपचे मंत्री यांची ही पहिलीच बैठक असेल. संघाच्या येथील यशवंत भवनात १८ आणि १९ जानेवारीला दिवसभर बैठक होणार आहे.

**संघ परिवाराचे अजेंड्यावर लक्ष**

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार असताना रा. स्व. संघाने भाजपच्या मंत्र्यांची अशीच एक बैठक मुंबईत घेतली होती. त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपचे दहाच कॅबिनेट मंत्री होते. यावेळी भाजपचे १७ मंत्री आणि ३ राज्यमंत्री आहेत. या राज्यमंत्र्यांचे कॅबिनेट मंत्री हे शिंदेसेना किंवा अजित पवार गटाचे आहेत. अशावेळी त्या खात्यांमधील आपला अजेंडा राज्यमंत्र्यांमार्फत पुढे नेण्याचा संघाचा प्रयत्न असेल.

**बडेजाव करू नका**

सूत्रांनी सांगितले की, संघाकडून मंत्र्यांनी कसा कारभार करावा या बाबतच्या अपेक्षा निश्चितपणे सांगितल्या जातील. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या सरकारचा कारभार पारदर्शक आणि प्रामाणिक असेल असे आधीच म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बडे जाव नको, साधे राहा असे मंत्र्यांना बजावले आहे. याच धर्तीवर संघ मंत्र्यांना उद्बोधन करेल, असे मानले जाते.

**निवडक मंत्रालयाकडून संघाची मोठी अपेक्षा**

कामगार, उच्च व तंत्रशिक्षण, पशुसंवर्धन, आदिवासी विकास, ग्रामविकास, वनविभागाशी संबंधित विषयांवर विशेषत्वाने संघाची भूमिका आणि अपेक्षा याबाबत मंत्र्यांना अवगत केले जाईल, अशी माहिती आहे.

# राष्ट्रीय संशोधन संस्था 'व्हीएनआयटी'ने तयार केले नक्षत्र यंत्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८हिंगणा**




राष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्था व्हीएनआयटीद्वारा आजवर रसायनशास्त्र अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी यासह अनेक क्लिष्ट विषयांवर संशोधन करण्यात आले. देशभरातील विविध नागरी समस्यांवर प्रत्यक्ष उपाययोजना काढणे तसेच अनेक महत्वपूर्ण प्रकल्पांमध्ये सल्लागार म्हणून कार्य केले आहेत. आता व्हीएनआयटीच्यावतीने भारतीय कालगणनेचा प्रचार प्रसार करण्यासाठी अत्याधुनित तिथी व नक्षत्र यंत्राची निर्मिती करण्यात आली. या यंत्राची स्थापना नागपूरमधील हिंगणा येथील कान्होलीबारा स्थित आर्यभट्ट स्ट्रॉनॉमी पार्कमध्ये स्थापना करण्यात आली असल्याची माहिती व्हीएनआयटीचे संचालक प्रेमलाल पटेल यांनी दिली.

जगभरात ग्रेग्रोरियन कैलेंडर व कालगणना प्रचलित आहे. भारतीय कालगणना ही वैज्ञानिक व ग्रह नक्षत्रांवर आधारित असून, सामान्य लोकांना याची माहिती नसल्यामुळे प्रचलनात नाही. सामान्यपणे तिथी ही व्रत, मुहूर्ते व सणांच्या निश्चितीसाठी महत्वपूर्ण आहे. अमावस्या, पौर्णिमा, कोजागरी, विजयादशमी, चतुर्थी, एकादशी याबाबत लोकांना माहिती आहे, मात्र त्यामागील कारणे माहित नसल्यामुळे व्हीएनआयटीच्यावतीने तिथी व नक्षत्र यंत्राचे संशोधन करण्यात आली असल्याचे प्रेमलाल पटेल यांनी सांगितले. शालेय तथा महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच शिक्षकांना हे आर्यभट्ट ॲस्ट्रॉनॉमी पार्क वैदिक विज्ञान व आधुनिक विज्ञानाची माहिती देणारे विदर्भातील एकमेव पर्यटन स्थळ आहे. आतापर्यंत या विषयावर कुठेही संशोधन झाले नाही. हे संशोधन विदर्भवासियांसाठी कौतुकाची गोष्ट आहे. याचे लवकरच पेटेंट होणार असून या संशोधनाचे अहवाल जगभरात लवकरच प्रकाशित करण्यात येणार आहे. असेही डॉ. प्रेमलाल पटेल यांनी सांगितले.

**कसे कार्य करणार?**

ग्रहांच्या भ्रमणीनुसार दिवस, वार, महिना व वर्ष यांची उत्पत्ति भारतीय ऋषींनी केली. जेव्हा चंद्र १२ अंश सूर्याच्या पुढे सरकतो त्या काळास तिथी असे म्हणतात. याप्रमाणे प्रत्येक १२ अंशाला एक तिथी तयार होऊन संपूर्ण एका चंद्राच्या पृथ्वीभोवती परिभ्रमणांत म्हणजे ३६० अंशात ३० तिथी तयार होतात. यावरून ३० दिवसांचा महिना हा सिद्धांत प्रचलनात आला आहे. तिथी ही चंद्र भ्रमणावर आधारित असल्यामुळे चंद्राच्या शीघ्र किंवा मंद गतीनुसार तिथीचा काळ ठरतो. कधी १८ तास तर कधी २७ तास असा हा कालावधी असतो. हे यंत्राद्वारे तयार करण्याचे अत्यंत कठीण कार्य व्हीएनआयटीच्या प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात करून दाखविले. या संशोधनाला एक वर्ष लागला. मार्च २०२४ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी या पार्कला भेट दिली होती. त्यावेळी त्यांना नक्षत्र यंत्राबाबत माहिती देण्यात आली होती अशी माहिती तत्कालीन संचालक डॉ. प्रमोद पडोळे यांनी दिली.

# महाराष्ट्रात 'इनोव्हेशन सिटी' निर्माण करणार, मुख्यमंत्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नागपूर**

कृत्रिम बुद्धीमत्ता आणि तत्सम क्षेत्रात तंत्रज्ञानाने केलेल्या प्रगतीमुळे आपल्या मनातील कल्पनांना मूर्त रुप देणे शक्य झाले आहे. नवनवे संशोधन (इनोव्हेशन) होत आहेत, त्याला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रात इनोव्हेशन सिटी तयार करणार आहे, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे केले.



नागपूरमध्ये सुरू असलेल्या संगणक प्रदर्शनाला (कॉम्प-एक्स २०२५) फडणवीस यांनी शुक्रवारी भेट दिली. त्याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात त्यांनी वरील मत व्यक्त केले. ते म्हणाले, हे स्टार्टअपचे युग आहे. महाराष्ट्र देशात या क्षेत्रात प्रथम क्रमांकावर आहे. युवकांचा कल कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित (एआय) स्टारटप सुरू करण्याकडे अधिक आहे. संपूर्ण जगच या दिशेने वाटचाल करीत आहे. नागपूर विदर्भातही यासंदर्भात एक व्यवस्था तयार झाली आहे.ए.आय.च्या माध्यमातून रोज नवनवे इनोव्हेशन होत आहे. त्याला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने महाराष्ट्रात इनोव्हेशन सिटी तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. संगणकीय क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानामुळे आपल्या मनात असलेल्या कल्पनांना मुर्त रुप देणे शक्य झाले. विविध क्षेत्रात होणाऱ्या संशोधनासाठी इनोव्हेशन सिटी तयार करणे ही काळाची गरज झाली आहे. आगामी काळात तंत्रज्ञान क्षेत्रातही महाराष्ट्र अग्रेसर असेल,असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. दरम्यान नागपूरच्या ट्रिपल आयटीमध्ये गुगलचे ए.आय.एक्सलन्स केंद्र सुरू करणार असून याबाबत मुंबईत करार झाल्याची माहितीही फडणवीस यांनी यावेळी दिली.

# ॲट्रासिटी कायद्याचे उल्लंघन, मुख्यमंत्री माजी मुख्यमंत्र्यांना कायदेशीर नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नागपूर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा व नियमावलीचे पालन करण्यात कसूर केल्याप्रकरणी संविधानाचे अभ्यासक व निवृत्त सनदी अधिकारी इ.झेड. खोब्रागडे यांनी अधिवक्ता डॉ. सुरेश माने यांचे मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. देशातील दलित आदिवासी अन्याय अत्याचार प्रकरणांना प्रतिबंध कर व पीडिताना न्याय देण्यासाठी भारतीय संसदेने अनुसूचित जाती, अनुसूचित



जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा (१९८९) संमत केला. या कायद्यानुसार या कायद्याची अंमलबजावणी करणे ही राज्य सरकारांची जवाबदारी आहे.

त्या कायद्यात व नियमावलीत राज्य सरकारांच्या विविध जबाबदारी निश्चित केल्या आहेत. त्यापैकी २०१६ च्या सुधारित नियमावलीनुसार राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील सुकाणू समितीने वर्षातून किमान दोन बैठका घेऊन अन्याय, अत्याचार प्रकरणाचा आढावा घेणे, परिणामकारक कार्यवाही करणे बंधनकारक आहे. अशाच बैठका विभागीय व जिल्हा स्तरावर देखील घेणे बंधनकारक आहेत.

**कायद्याचे उल्लंघन गुन्हा**

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे पालन न करणे, उल्लंघन करणे, कर्तव्य, जबाबदारीकडे दुर्लक्ष करणे हा कायद्यानुसार गुन्हा असल्याचे नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे, अशी माहिती ड. सुरेश माने यांनी दिली.

# तुळजाभवानी मातेच्या भक्तांना आता शुद्ध तुपातील लाडूचा प्रसाद

## यापूर्वी मिळायचा तूप, शेंगदाणा तेलातील प्रसाद, काजू, बदाम, केशर, साखरेचे प्रमाण निश्चित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८तुळजापूर**

ळजाभवानी मातेच्या भक्तांना पुन्हाएकदा लाडू-प्रसाद उपलब्ध करुन देण्यातयेणार आहे. यावेळी केवळ शुद्ध तुपातीललाडूंचा प्रसाद तयार करण्यात येणारआहे. तुपातील लाडू पुरवण्यासाठीनिविदा प्रक्रिया सुरू आहे. राज्यपातळीवरील चार नामांकित कंपन्यांनीनिविदा भरल्या आहेत.



मंदिर संस्थान विश्वस्तांच्या बैठकीतीलनिर्णयानुसार भाविकांना लाडू-प्रसादउपलब्ध करुन देण्यासाठी दाखलनिविदांची छाननी प्रक्रिया सुरू आहे.यानंतर दरपत्रक मागवण्यात येणारअसल्याचे सांगण्यात आले. मंदिरसंस्थानचे अध्यक्ष जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, विश्वस्त आमदारराणाजगजितसिंह पाटील, व्यवस्थापकतहसीलदार माया माने यांच्यामार्गदर्शनाखाली मंदिर संस्थानचेअधिकारी, कर्मचारी हे भाविकांनालाडू-प्रसाद उपलब्ध करुन देण्यासाठीप्रयत्न करीत आहेत.

**शिर्डी प्रमाणे दुहेरी निविदाप्रक्रिया रद्द, तयार प्रसाद घेणार**

लाडू प्रसादाचा दर्जा भाविकांना दर्जेदारलाडू-प्रसाद मिळण्यासाठी काजू, बदाम,किसमीस, केशर, तूप, साखर, खायचारंग आदींचे प्रमाण निश्चित करण्यातआले आहे. मंदिर संस्थानच्या नियंत्रणाततयार लाडू-प्रसाद पुरविण्याची निविदाप्रक्रिया सुरू आहे. चैत्र यात्रेपूर्वीभाविकांना लाडू-प्रसाद मिळण्याचीआशा व्यक्त करण्यात येत आहे. कोरोनामहामारीपूर्वी भाविकांना लाडू-प्रसादमिळत होता. राखण्यासाठीसुरूवातीला शिर्डीच्या धर्तीवर दुहेरी निविदाप्रक्रिया राबविण्याचा निर्णय मंदिर संस्थाननेघेतला होता. यात पहिल्या टप्प्यात मंदिरसंस्थान लाडू प्रसादासाठी साहित्य खरेदीकरणे व दुसऱ्या टप्प्यात चांगल्या प्रतीचेकिराणा साहित्यातून मंदिर संस्थानठेकेदाराकडून लाडू-प्रसाद तयार करुनघेणार होते. मात्र लाडू तयार करुन घेणेअव्यावहारिक असल्याचे सांगत दुहेरीनिविदा प्रक्रिया रद्द करुन तयार लाडू प्रसादघेण्याचा निर्णय घेण्यात आला.

**शेंगदाणा तेलाचा लाडू प्रसाद रद्द**

यापूर्वी शुद्ध तुपातील व शेंगदाणातेलातील, असा दोन प्रकारचालाडू-प्रसाद भाविकांना उपलब्धकरुन देण्यात येत होता. दोन्ही लाडूप्रसादासाठी भाविकांना वेगवेगळे दरआकारण्यात येत होते. मात्रभाविकांना दर्जेदार लाडू प्रसादमिळण्यासाठी शेंगदाणा तेलातीललाडू प्रसाद रद्द करण्यात आलाआहे. यावेळी भाविकांना केवळशुद्ध तुपातील लाडू उपलब्ध करुनदेण्यात येणार आहेत.

**पंचखाद्य प्रसादाचा पर्याय सध्या वेटिंगवर**

मंदिर संस्थानने लाडूप्रसादासोबतच भाविकांना काजू, बदाम, खजूर,खडीसाखर आदी पंचखाद्य प्रसादाचा पर्याय उपलब्ध करण्याचा निर्णयविश्वस्त समितीच्या बैठकीत घेतला होता. मात्र सध्या तरी केवळ लाडूप्रसादाची निविदा प्रक्रिया सुरू आहे. पंचखाद्य प्रसाद वेटिंगवरअसल्याचे सांगण्यात येत आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# सार्वजनिक कामातून समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न - मंत्री संजय राठोड

## बोडना येथील समाज मंदिराचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १८ अमरावती**



गावापासून देशापर्यंतच्या विकासात समाज मोठे योगदान देते. त्यामुळे समाजाच्या विकासासाठी जेही शक्य आहे, त्या सर्व बाबी प्राधान्याने करण्यात येतील. यात सार्वजनिक कामातून समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले.

बोडना येथील चापालाल महाराज पुण्यतिथी, समाज मंदिराचा लोकार्पण सोहळा व जाहिर सत्कार सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार बाबूसिंग महाराज, सुनील राणा, आशिष धर्माळे, श्याम देशमुख, दिलीपराव ठाकरे, देवानंद चव्हाण आदी उपस्थित होते.

मंत्री श्री. राठोड यांनी, राज्य आणि देशभरात बंजारा समाज विविध क्षेत्रात अग्रेसर आहे. समाजाला योग्य दिशा मिळवून देण्यासाठी शासनाचा एक प्रतिनिधी म्हणून कार्य करीत आहे. समाजाच्या लहान घटकांपर्यंत पोहोचून त्यांचे प्रबोधन करण्यात येत आहे. आज चापालाल महाराज पुण्यतिथी अणि समाज मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने गावपातळीवरील कार्यक्रमात सहभागी होता आले.

आजच्या कार्यक्रमात समाज मंदिराच्या निमित्ताने विकासकामाला गावात सुरवात झाली आहे. समाजासाठी जेही शक्य आहे, ती मदत करण्यात येईल. तसेच समाजाचे तांडे आणि गाव याठिकाणाहून निमंत्रण आल्यास त्याठिकाणी प्राधान्याने उपस्थित राहण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यामाध्यमातून समाजाची सेवा करण्याचा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमापूर्वी मंत्री श्री. राठोड यांच्या हस्ते आमदार निधीतून उभारण्यात आलेल्या समाज मंदिराचे फित कापून लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर श्री. राठोड यांचा शाल व श्रीफळ देऊन जाहिर सत्कार करण्यात आला. पुष्पवृटीत श्री. राठोड यांचे स्वागत करण्यात आले. पारंपारिक बंजारा वेशभूषेत महिलांनी औक्षण केले.

# कमी भावामुळे कापूस विकता येईना:अन् पिसवा आता घरातही बसू देईना

## भाव मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त, शेतकऱ्यांच्या आरोग्याचा धोका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मोर्शी**

शेतकऱ्यांनी घाम गाळत पिकवलेल्या कापसाची यंदा वाताहत झाली आहे. या पांढऱ्या सोन्याला प्रतिक्विंटल किमान १० हजारांचा भाव मिळेल या आशेने घरात कापूस साठवून ठेवल्याने कापूस विकता येईना अन् पिसवा घरात बसू देईना अशी गत शेतकऱ्यांची झाली आहे. वातावरणामुळे साठवलेल्या कापसात बारीक कीटक तयार झाले आहेत. या कीटकांमुळे लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत कीटक चावणे, खाज सुटणे असा त्रास शेतकरी कुटुंबीयांना रात्रंदिवस सहन करावा लागत आहे. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सद्य:स्थितीत सीसीआयमध्ये कापूस देऊन पैसे कधी मिळेल याची हमी नसल्यामुळेच कापसाला हमीभावापेक्षाही कमी भाव मिळत आहे. काही



शेतकऱ्यांनी दर वाढतील या आशेने कापूस घरात साठवून ठेवला. मात्र, या कापसातच आता पिसवा तयार होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अंगावर खाज, पुरळ येत आहे. आधीच दर कमी, त्यात साठवला तर आरोग्याला धोका, अशी स्थिती शेतकऱ्यांची झाली आहे.

कापसाला दहा हजार रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळेल या आशेवर शेतकरी आहेत. परंतु दिवसेंदिवस भाव कमी होत असल्याने आर्थिक संकटांना सामोरे लागत आहे. यंदा केंद्र शासनाने कापसाला ७५२१ गेल्या अनेक दिवसांपासून कापूस घरीच असल्याने आता कापसाच्या संपर्कात आल्यास किंवा हात लावल्यास खाज सुटत आहे. याचा विपरीत परिणाम शेतकऱ्यांच्या शरीरावर व्हायला लागला आहे. कापसामुळे हातापायांवर, पाठीवर, पोटावर मोठ्या प्रमाणात पुरळ येत आहे. त्वचा लाल पडत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी उपचार घेत आहेत.

# शिक्षक कोरिओग्राफर, विद्यार्थी कलाकार
# जिल्ह्यातील बहुतांश शाळांमध्ये स्नेहसंमेलनाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

वर्षभराच्या अभ्यासाच्या ताणतणावातून विद्यार्थ्यांना मोकळीक मिळावी, यासाठी शाळांमध्ये स्नेहसंमेलन आयोजित केले जाते. जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये एक दिवसाचे, तर काही शाळांमध्ये तीन दिवसीय स्नेहसंमेलनाचे आयोजन केले जाते. स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मोठ्या प्रमाणावर वाव मिळून पुढील वर्षी त्यांना त्यापेक्षाही चांगले कार्यक्रम करण्याची उमेद यातून मिळते विद्यार्थ्यांसोबतच पालकांमध्ये स्नेहसंमेलनाला घेऊन उत्साह बघावयास मिळतो, हे विशेष.



अनुदानित व खासगी शाळांसह महाविद्यालयांमध्येही सद्यस्थितीत स्नेहसंमेलनाची चांगलीच धूम सुरू असून, शिक्षकच कोरिओग्राफर अन् विद्यार्थी कलाकार झाले आहेत.विविध शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. या स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मोठ्या प्रमाणावर वाव मिळत आहे. स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थीही उत्साहात दिसून येत आहेत. त्यांनामिळणाऱ्या संधीमुळे त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळत असते. स्नेहसंमेलनातून बालगोपालांचे नृत्य, एकांकिका पाहण्यासाठी पालक व गावकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहतात.

**स्नेहसंमेलनामुळे अनेकांना रोजगार**

स्नेहसंमेलनामुळे अनेकांना रोजगाराची संधी मिळत आहे. यात फोटोग्राफर, साऊंड सिस्टिम, पेंटर, मंडप डेकोरेशन, कोरिओग्राफरसह विविध ड्रेस डिझायनर यांनाही सध्या मोठ्या प्रमाणावर मागणी वाढली आहे. शाळांमध्ये शिक्षकच कोरिओग्राफरचे काम करतात.

स्नेहसंमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमात रेकॉर्डिंग गाण्यांचा वापर करून यू-ट्यूब व रील्स बनविल्या जातात. मुलांचे कला- कौशल्य गुण नवीन तंत्रज्ञानाद्वारे जगासमोर पोहोचविले जाते. त्यातच काही पालक स्टेटस ठेवून पाल्यांचे कौतुक करतात.

# सीसीआयची कापूस खरेदी फेब्रुवारीत होणार बंद

## हमीदर कमी करीत केली खरेदीची गतीही मंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती,**

हमीदराने कापसाची सीसीआय करीत असलेली खरेदी जानेवारी अखेर बंद होणार आहे. कापसाचे दोन वेचे झाले असून उलंगवाडीची वेळ आली असून त्यानंतरचा कापूस फरदळ या श्रेणीत येत असल्याने सीसीआय त्याची खरेदी करीत नाही. परिणामी खासगी बाजारातील कापसाची उलाढाल वाढण्याची शक्यता आहे.



खरीप हंगामातील कापसाची मोठी उलाढाल सद्या बाजारपेठेत आहे. कापूस पणन महासंघ मोडीत निघाल्याने सीसीआयमार्फत कापसाची हमीदराने खरेदी सुरू आहे. कापसाचे दर रूईच्या उताऱ्यावर ठरतात. पहिल्या वेच्यातील फेअर दर्जाच्या कापसापासून रूईचा उतारा ३८ किलोवर येतो. त्यास सीसीआयने लांब धाग्याच्या कापसास प्रतीक्विंटल ७५२५ रूपये दर दिला. आता दुसऱ्या वेच्यातील कापसाची आवक होत असून त्यापासून रुईचा उतारा ३५ किलोच्या जवळपास येत असल्याने हमीदरात शंभर रूपयांची कपात करण्यात आलीआहे. शेतकऱ्यांनी त्यांच्याकडील कापूस खुल्या बाजाराच्या तुलनेत सीसीआयला विकण्यास प्राधान्य दिले आहे. खुल्या बाजारात सरासरी ७३६२ रूपये दर आहे. कापसाचा हंगाम आता उलंगवाडीवर आला आहे. भाव आणखी वधारतील या अपेक्षेने काही शेतकऱ्यांनी कापूस घरात साठवून ठेवला आहे. हा कापूस सीसीआयची खरेदी बंद झाल्यावर बाहेर येण्याची शक्यता आहे. दरम्यान सीसीआयने हमीदर कमी करीत कापसाच्या खरेदीचे प्रमाणही कमी केले आहे. जानेवारी अखेरपर्यंत सीसीआयची खरेदी चालणार असून फेब्रुवारीत खरेदी केंद्र बंद करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# २६ जानेवारीपासून रहाटगाव स्मशानभूमितच संतप्त नागरिक करणार उपोषण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

स्थानिक रहाटगांव येथील स्मशानभूमिची जागा बळकाविण्याचा प्रयत्न काही लोकांकडून होत असून ही स्मशानभूमी वाचविण्यासाठी स्थानिकांनी आता आक्रमक भूमिका घेतली आहे. वारंवार अर्ज देवून तसेच पुरावे देवून सुद्धा प्रशासनाकडून कुठलीच कार्यवाही होत नसल्याने अखेर नागरिकांनी २६ जानेवारीपासून स्मशानभूमीतच उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे हा मुद्दा तापणार हे मात्र निश्चित.रहाटगाव परिसरातील नागरिकांनाअंत्यसंस्कारासाठी दुसरी जागाचनसून गेल्या अनेक दिवसांपासूनही स्मशानभूमी अतिक्रमणमुक्त करण्याची मागणी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच मनपा आयुक्तांकडे केली जात आहे.विशेष म्हणजे स्मशानभूमीच्या बोर्डावर काही लोकांनी नाव मिटविण्याचा प्रयत्न सुद्धा केला आहे. त्यामुळे ही स्मशानभूमी वाचविण्यासाठी आता २६ जानेवारीपासून तेथेच उपोषण करणार असल्याचा इशारा सुभाष चौधरी, रमेश कडू, तुषार पडोळे, उमेश जयस्वाल, राजू पडोळे, गजान रामेकर, राम काकडे, निखील देवघरे, दिलीप रामेकर, दिलीप मंडाळकर, रणजीत दिवे, दादाराव दिवे, अनिल दिवे, दत्ता देवघरे, चंद्रशेखर देवघरे, अनिल खेकाडे, आशीष खेकाडे, चंदू पाथरे, रमेश धामणकर, वामनराव गिरी आदींनी दिला आहे.

# संतापलेल्या विस्तार अधिकाऱ्यांचा बोर्डाच्या परीक्षेवर बहिष्कार

## तब्बल २४ वर्षांपासून एकाच पदावर कार्यरत असल्याने संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

फेब्रुवारी महिन्यात शिक्षण मंडळाच्या दहावी व बारावी होऊ घातल्या आहे. या परीक्षेमध्ये परिरक्षक (कस्टिडियन) म्हणून भूमिका निभवणारे विस्तार अधिकारी (शिक्षण) हे संपूर्ण परीक्षेच्या कार्यावर बहिष्कार टाकणार आहे. विस्तार अधिकारी संघटनेतील अनेक कर्मचारी २४ वर्षापासून एकाच पदावर कार्यरत असल्याने पदोन्नती व विविध मागण्यासाठी विस्तार अधिकारी संघटनेने हे पाऊल उचलत आंदोलनाच्या पवित्र्यात आहे.शालेय शिक्षण विभागात शाळा ते जिल्हा परिषद दरम्यान विस्तार अधिकारी हे महत्वाची भूमिका निभावतात. राज्यात मोठ्या प्रमाणात गटशिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी हे वर्ग दोनचे पद रिक्त असल्याने या पदाची जबाबदारी गत अनेक वर्षापासून विस्तार अधिकार (शिक्षण) हे सांभाळत आहेत.जिल्हा परिषद, पंचायत समिती व शाळांची महत्वाची जवाबदारी या पदावर असून यासह राज्यस्तरीय विविध शिक्षण



संस्था व परीक्षा मंडळातील महत्वाची जयाचदारी विस्तार अधिकारी सांभाळतात. काही जिल्हा परिषद मध्ये नव्याने भरती झालेल्या अधिकाऱ्यांना लागल्या बरोबर वर्ग दोन पदाचा प्रभार दिला आहे. तर काही विस्तार अधिकारीकडे दोन ते तीन पदाचा प्रभार दिल्या जात आहे. इंतर विभागप्रमाणे जलद गतीने पटोचती करणे, स्टाफ पॅटर्न मध्ये बदलाव, प्रभारांचा भार कमी करने व अन्य मागण्यासाठी विस्तार अधिकारी पावित्र्यात आहे. संघटना आंदोलनाच्या पावित्र्यात आहे.

**वेतन वर्ग एकचे पद वर्ग तीनचे**

विस्तार अधिकारी पदावरील अनेक अधिकारी यांनी सेवेचे २४ वषपिक्षा अधिक काळ काम केले आहे. काही विभागात एवढ्या कालावधीत वर्ग तीनचे अधिकारी वर्ग एक मध्ये पदोन्नत होतात. शिक्षण विभागात दहा ते पंधरा वर्षापूर्वी नियुक्त झालेले शिक्षणाधिकारी (वर्ग एक) पदाकरील अनेक अधिकारी पदोप्रतीने उपसंचालक तर काही सहसंचालक पदावर कार्यरत आहे. मात्र विस्तार अधिकारी पदावरील अनेक सेवाज्येष्ठ कर्मचारी नियुक्ती पासून त्याच पदावर कार्यरत आहे. अनेक वर्षापासून एकाच पदावर कार्यरत असल्याने अधिकाऱ्यांमध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

# स्वामित्व योजनेमुळे ग्रामीण जनतेत बळकटी येईल -जिल्हाधिकारी सौरभ कटियार

## प्रधानमंत्र्यांचा लाभार्थ्यांशी संवाद : जमिनीच्या सनदीचे वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १८ अमरावती**

स्वामित्व योजनेतून गावठानाच्या जमिनी मुळ मालकाच्या नावावर होणार आहे. यासाठी भूमी अभिलेख विभागाने मेहनत घेतली आहे. या योजनेतून ग्रामीण जनजीवनाला बळकटी मिळेल, असे मत जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी व्यक्त केले.



जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हास्तरीय स्वामित्व योजनेतून सनद वितरणाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार प्रतापदादा अडसड, भूमी अभिलेखचे उपसंचालक डॉ. लालसिंग मिसाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बयास, जिल्हा भूमी अभिलेख अधिकारी महेश शिंदे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, स्वामीत्व योजनेमुळे एक चांगले काम झाले आहे. इंग्रजकाळात जमिनीचा सातबारा अस्तित्वात आला. त्यानंतर आता स्वामित्व योजनेमुळे गावठाणाची जमीन मालकी हक्काने मिळणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने ग्रामीण भागातील नागरिकांना याचा फायदा होणार आहे. यामुळे जमीनवर कुणालाही हक्क सांगता येणार नाही. त्यामुळे जमीन विषयक तंटे कमी होण्यास मदत मिळेल. नागरिकांच्या नावे जमीन असल्यामुळे त्यांना घर बांधणीसाठी बँकांचे कर्ज सहज उपलब्ध होतील. यापुढील टप्प्यात नागरी भागात ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागात केलेल्या चांगल्या कामाप्रमाणे शहरी भागातही भूमी अभिलेखने कामे करावीत, असे आवाहन केले.

आमदार श्री. अडसड यांनी योजनेचा फायदा मोठ्या प्रमाणावरील जनतेला होणार आहे. जमीन नावावर होणे ही अतिशय चांगली बाब आहे. नागरिकांच्या दृष्टीकोनातून महत्वाचे काम होत आहे. त्यामुळे त्यांच्या कामाला प्राधान्य देण्यात यावे. या योजनेत ग्रामीण भागातील अर्थकारण बदलविण्याची क्षमता असल्याने योजना राबविताना आलेल्या अडचणी सोडविण्यात याव्यात. यात आलेल्या त्रृटी प्राधान्याने दुरूस्त कराव्यात, असे सांगितले.

श्री. शिंदे यांनी प्रास्ताविकातून योजनेची माहिती तसेच होणाऱ्या लाभाबाबत माहिती दिली. श्री. बयास यांनी मनोगत व्यक्त केले. सुरवातीला योजनेबाबत चित्रफित दाखविण्यात आली. यावेळी संजय धर्माळे, विद्या माहुरे, नंदू ठाकरे, प्रल्हाद चव्हाण, त्र्यंबक हांडे, गोविंद धवने, मनिष भटकर, लक्ष्मण शिरसाठ यांना प्रातिनिधीक स्वरूपात सनदीचे वितरण करण्यात आले.

**प्रधानमंत्र्यांचा संवाद**

यानिमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी योजनेच्या लाभार्थ्यांशी दुरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला. महाराष्ट्रातील एकमेव नागपूर येथून रोशन पाटील यांच्याशी त्यांनी सुरवातीला मराठीतून संवाद साधला. त्यांनी श्री. पाटील यांच्याकडून स्वामित्व योजनेच्या लाभासह इतर योजनांचा लाभ घेतला असल्याबाबत विचारणा केली. श्री. पाटील यांनी स्वामित्व योजनेमुळे कर्जाचा प्रश्न मार्गी लागला. मिळालेल्या कर्जातून घर बांधणी आणि शेतीमध्ये सिंचनाची व्यवस्था केल्याचे सांगितले. यामुळे तीन पिके घेण्यात येत असून उत्पन्नात वाढ झाल्याचे सांगितले. तसेच उज्ज्वला योजना, किसान सन्मान निधी आदी योजनांचा लाभ घेतला असल्याचे सांगितले.

दरम्यान आज देशभरातील ६५ लाख मालमत्ता सनदीचे वाटप करण्यात आले आहे. या योजनेत गावठाणाची जमीन मूळ मालकाच्या नावावर होणार आहे. याची सनदही देण्यात येणार आहे. यामुळे जमीनीचा मालकी हक्काबाबत पारदर्शकता येणार आहे. परिणामी जमीनसंबंधी होणारे दाव्यात लक्षणीय घट होणार आहे. यासोबतच जमीनीवर बँकेचे कर्जही सहज मिळणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागाला पुन्हा एकदा वैभव प्राप्त होणार आहे, अशी आशा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली.

# पन्नालाल नगर नाला दुरुस्ती तत्काळ करा : जन्म व मृत्यू नोंदणी दाखले लवकर मिळावे

## मिलिंद बांबल यांची मनपा आयुक्तांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

स्थानिक पन्नालालनगर मोठा नाला सुरक्षा भिंती नसल्याने खचला असून नागरिकांचा येण्या-जाण्याचा पुलाजवळील पन्नालालनगर शॉर्टकट रस्ता बंद झाला. शेकडो नागरिक, महिला, जेष्ठ नागरीक यांना जाण्यायेण्यासाठी हाच मुख्य रस्ता आहे. हा रस्ता नाल्याच्या बाजूने खचला असून मोठे खड्डे त्याला पडले आहे. त्यामुळे तो रस्ता केव्हाही खाली कोसळून पडू शकतो व एखादी मोठी दुर्घटना होऊन जीवितहानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या नाल्याची तत्काळ दुरुस्ती करण्याची मागणी माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल यांनी मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्याकडे केली आहे. यावेळी त्यांनी जन्म मृत्यू दाखल तत्काळ मिळावे, यासाठी विभागात सुधारणी करावी, तसेत शहरातील साफसफाईचा प्रश्न सोडवावा,






अशाही मागण्या चर्चे दरम्यान केल्यात. माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल यांनी पन्नालाल नगर नाल्यात उतरून आक्रमक आंदोलन केले होते. आंदोलनाची दखल घेवून मनपाने दुरुस्तीसाठी १० लाख रुपये मंजूर केले. टेंडर झाले. पण अद्याप कामाला सुरुवात झाली नाही. रस्ता पूर्ण खचला असून केव्हाही दुर्घटना होउन जीवितहानी होण्याची शक्यता आहे. माजी स्थायी समिती सभापती मिलिद बांबल यांनी मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांची भेट घेतली.

# पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाचे चार विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १८ अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठव्दारे घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२४ एम. ए. (राज्यशास्त्र) परीक्षेत पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाच्या चार विद्याथ्र्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविले आहे. अक्षय ज्ञानेश्वर वानखेडे याने ८.४७ सीजीपीएस प्राप्त करुन व्दितीय, तर कु. साक्षी दिनेश धुळे, वैभव नरेश सार्वे आणि कु. पौर्णिमा केशव मोगले या विद्याथ्र्यांनी अनुक्रमे चौथे, सहावे


आणि दहावे स्थान मिळविले आहे.

विभागातील शिक्षक श्री.महेंद्र भगत, रोहिणी गायधने, डॉ.गजानन ढवळी, डॉ. सपना रोंघे, श्री. हर्षवर्धन रोटे, कु. शीतल रोकडे यांचे विद्याथ्र्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच राज्यशास्त्र विभागाचे समन्वयक डॉ. प्रणव कोलते यांनी विद्याथ्र्यांचे अभिनंदन करुन उज्ज्वल भविष्याच्या शुभकामना दिल्यात.